cmyk

### संपादकीय

## मराठी माणसांमधील एकी, ही काळाची गरज

महाराष्ट्र सरकारच्या हिंदीकरणाविरोधात एकत्र येण्याची मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे व ठाकरेसेनेचे नेते उद्धव ठाकरे यांनी घेतलेली भूमिका ऐतिहासिकच म्हटली पाहिजे. मुळात मराठीकरिता दोन भाऊ आपले राजकीय मतभेद विसरून सोबत येणे, ही समस्त मराठी जनांकरिता सुखावह बाब ठरते. त्यामुळेच येत्या ५ जुलैला मुंबईत काढण्यात येणाऱ्या एकत्रित मोर्चाकडे राज्यासह संपूर्ण देशाचे लक्ष असेल. अलीकडेच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. याबद्दल सांप्रत सरकार निश्चितच अभिनंदनास पात्र होय.


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


## गडचिरोली जिल्हा अजूनही नक्षलग्रस्त; गृहविभागाची मोठी घोषणा

मुंबईः मार्च २०२६ पूर्वी देश नक्षलमुक्त करण्याच्या मोहिमेचा भाग म्हणून राज्यातील नक्षलग्रस्त भागात राज्य सरकारकडून प्रभावी कारवाया केल्या जात असून आता गडचिरोली जिल्हा आणि गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया, सालेकसा, देवरी व अर्जुनी मोरगाव हे चार तालुकेच नक्षलप्रभावीत असल्याची असल्याची घोषणा गृहविभागाने केली आहे. दरम्यान, गडचिरोली नक्षलमुक्त झाल्याचा पालकमंत्री आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाच महिन्यांपूर्वी केलेला दावा फोल ठरला आहे. राज्यात गेल्या २० वर्षांपासून नक्षलवादाविरोधात सरकार लढत असून गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर या जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात नक्षवाद्यांचा प्रभाव होता.


बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–६६ | रविवार, दि.२९ जून २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# परभणी जिल्ह्यात शक्तीपीठ महामार्गाला विरोध

## ३१ गावांतील शेतकरी एकवटले; जमीन मोजणी नाकारण्याचा ठाम निर्णय

**परभणी । प्रतिनिधी**

**नागपूर ते गोवा दरम्यान नवीन होणाऱ्या शक्तीपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध वाढत चालला आहे. या महामार्गासाठी शेतजमिनी घेतल्या जात असल्याने परभणी जिल्ह्यातील अनेक गावांमधील शेतकरी चिंतेत आहेत. या पार्श्वभूमीवर पोखरणी नरसिंह येथे ३१ गावांतील शेतकऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक झाली.**



या बैठकीत ठरले की, कोणत्याही परिस्थितीत शक्तीपीठ महामार्गासाठी जमिनी दिल्या जाणार नाहीत. सरकारने सुरू केलेल्या मोजणी प्रक्रियेलाही शेतकऱ्यांनी विरोध दर्शवला आहे. काही ठिकाणी मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना थांबवण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी स्पष्ट केले की, जमीन घेण्याआधी आमचा जीव घ्या, पण आम्ही जमिनी देणार नाही. शेतकऱ्यांनी असा इशारा दिला आहे की, जर सरकारने जबरदस्तीने जमीन घेण्याचा प्रयत्न केला, तर ते रस्त्यावर उतरून आंदोलन करतील. रास्ता रोको, जेल भरो अशा प्रकारची आंदोलने करण्याची त्यांची तयारी आहे. शेतकऱ्यांचा असा विश्वास आहे की, त्यांची जमीन हा त्यांच्या जीवनाचा आधार आहे आणि ती गमावणे त्यांना मंजूर नाही. सरकारकडून शक्तीपीठ महामार्गासाठी जमिनी संपादित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, पण शेतकऱ्यांनी विरोधाचा झंझावात उभारल्याने हे काम अडथळ्यात आले आहे. सध्या मोजणीसाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांना शेतकरी अडवत आहेत. सरकार आणि शेतकऱ्यांमध्ये यावरून तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की,

पान २ वर

# दोषी विजय पवारला राजकीय पाठबळ!

### आ.संदीप क्षीरसागर यांच्यावर निशाणा साधत डॉ.योगेश क्षीरसागर यांचा गंभीर आरोप

**बीड । प्रतिनिधी**

नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीच्या लैंगिक छळ प्रकरणातील आरोपी शिक्षक विजय पवारला राजकीय पाठबळ असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केला आहे. विजय पवार हा आ. संदीप क्षीरसागरांचा राईट हॅन्ड असून, घटनेनंतर रात्री आमदारांच्या घरी जाऊन संबंधित यंत्रणांना फोन केले गेले. इतक्या गंभीर गुन्ह्यात आरोपी फरार राहतो, यामागे कोणाचा दबाव आहे का, याचा तपास झाला पाहिजे. शिक्षण क्षेत्रात पवार यांचा दबदबा असून, याआड अनेक आर्थिक



गैरव्यवहार झाले असल्याचा आरोपही डॉ.क्षीरसागर यांनी केला. या प्रकरणाची सखोल चौकशी करून पीडितेला न्याय द्यावा. तसेच, सोमवारी बीड जिल्हा बंद पुकारण्यात आला असून सर्वांनी सहभागी व्हहा आमदार संदीप क्षीरसागर यांचा निकटवर्तीय आहे. गुन्हा दाखल

पान २ वर

# शिंदेंनी भाजपला अडचणीत आणण्यासाठी हिंदी भाषा सक्तीचा जीआर काढला का?

**मुंबई । प्रतिनिधी**

**हिंदी भाषेच्या मुद्द्यावरुन राज्यात सध्या रान पेटले आहे. त्यातच आता युवासेनेचे अध्यक्ष आमदार आदित्य ठाकरे यांनी एक खळबळजनक सवाल उपस्थित केला आहे. भाजपला आणि देवेंद्र फडणवीसांना अडचणीत आणण्यासाठी एकनाथ शिंदे यांनीच हा हिंदी सक्तीचा जीआर काढला आहे का? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे.**



**फडणवीसांच्याविरोधात महायुतीच्या सरकारमध्ये काम सरु असल्याचा आरोपही त्यांनी केला. त्याचबरोबर शालेय**

### आदित्य ठाकरेंचा खळबळजनक सवाल

**शिक्षण मंत्री दादा भुसे यांचा राजीनामा घ्यायला हवा, अशी मागणीही त्यांनी केली.**

आदित्य ठाकरे म्हणाले, ''महायुती सरकार सध्या हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर मविआ सरकारनं काढलेल्या अहवालाबाबत बोलत आहे. पण अहवालानंतर अभ्यासगट स्विकारण्यात आला होता, ही वेगळी गोष्ट आहे. पण आम्ही हिंदी सक्तीचा नाही तर मराठी सक्तीचा जीआर काढला होता. मुंबई महापालिकेत आम्ही बोर्डासह इतर सर्व बोर्डांच्या शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीची केली होती. ही हिंदी भाषा किंवा तिसरी भाषा लादण्याचे काम आहे हा जीआर कोणी काढला?

पान २ वर

## हिंदी सक्तीला विरोध, पण काँग्रेस ५ जुलैच्या मोर्चापासून दूर राहणार हर्षवर्धन सपकाळ यांची घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

**भाषा धोरणाबाबत भाजपची दुटप्पी भूमिका असल्याचा आरोप करत काँग्रेसने गुजरातमध्ये पहिलीपासून हिंदी सक्ती नाही तर महाराष्ट्रातच कशासाठी? असा सवाल केला आहे. दरम्यान, हिंदी सक्तीविरोधातील ५ जुलै रोजी होणाऱ्या मोर्चापासून काँग्रेस दूर राहण्याची शक्यता आहे. तसे संकेत महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले आहेत.**



मुंबईत शनिवारी (दि. २८ जून) पत्रकारांशी बोलताना सपकाळ म्हणाले की, हिंदी भाषेचा

पान २ वर

### गुजरातमध्ये नाही तर महाराष्ट्रातच सक्ती कशासाठी?

महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा सक्ती करण्याचा शासन आदेश जारी झाल्यापासून हा निर्णय रद्द करावा, अशी भूमिका काँग्रेसने घेतली आहे. ८ व्या सुचीतील सर्वभाषा संपवून केवळ हिंदी एकच भाषा ठेवायची हा संघ व भाजपचा कुटील डाव आहे. हा कुटील डाव हाणून पाडू आणि मराठीचा गळा घोटू देणार नाही, असा इशारा हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे. एका प्रश्नाला उत्तर देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ म्हणाले की, गुजरातमध्ये पहिलीपासून हिंदी नाही तर मग महाराष्ट्रातच पहिलीपासून हिंदी कशासाठी? गुजरातमध्ये एक निती आणि महाराष्ट्र दुसरी निती कशी? हे फडणवीस आणि बावनकुळे यांनी स्पष्ट करावे, हा भाजपचा दुटप्पीपणा आहे. तसेच गोलवलकर यांच्या बंच ऑफ थॉटबद्दल त्यांनी भूमिका स्पष्ट करावी, असेही त्यांनी म्हटले आहे.

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या अध्यक्षांकडून कामकाजाचा आढावा

### महामंडळ अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केली नियोजित उपविभागीय कार्यालयाच्या जागेची पाहणी



**बीड । प्रतिनिधी**

**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी आज बीडच्या जालना रोड येथे होत असलेल्या महामंडळाच्या उपविभागीय कार्यालयाच्या जागेची पाहणी केली. यासह याठिकाणी महामंडळाच्या कामकाजाचा सविस्तर आढावाही घेतला. मराठवाड्यातील महामंडळाचे सर्व जिल्हा समन्वयक, संबंधित कर्मचारी उपस्थित होते.**

मराठवाडा विभागातील हे कार्यालय सुसज्ज आणि अद्ययावत असणार आहे. पात्र लाभार्थ्यांना या ठिकाणी महामंडळाकडून देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा येथे उपलब्ध असतील. या उपविभागीय कार्यालयामुळे मराठवाड्यातील लाभार्थी यांचा वेळ वाचेल. अधिकाधिक लाभार्थी यांना महामंडळाच्या योजनांचा लाभ देण्यासही लाभार्थी व महामंडळ यांना सोयीचे होईल.

पान २ वर

## सरन्यायाधीश पदापर्यंतच्या प्रवासात नागपूरचे योगदान महत्त्वाचे – सरन्यायाधीश भूषण गवई

**नागपूर । प्रतिनिधी**

**नागपूर शहरासोबत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. दरवर्षी धम्मप्रवर्तन दिनी आई–वडीलांसोबत दिक्षाभूमीवर येत असे. पुढे वकिली व न्यायदान क्षेत्रात नागपूर जिल्हा व सत्र न्यायालय, जिल्हा वकील संघटना आणि उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठ येथे काम करतांना बऱ्याच गोष्टी आत्मसात करता आल्या, अशा भावना भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी मोकळेपणे व्यक्त केल्या.**

जिल्हा व सत्र न्यायालय येथे नागपूर जिल्हा वकील संघटनेच्या वतीने सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार करण्यात आला. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या मातोश्री कमलताई गवई आणि पत्नी डॉ. तेजस्विनी गवई, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

पान २ वर

# कर्जमाफीची तारीख मुख्यमंत्र्यांनी पांडुरंगाला तरी सांगावी–बच्चू कडू



### 'सातबारा कोरा करा' या पदयात्रेची घोषणा

**अमरावती । वृत्तसंस्था**

यंदा आषाढी एकादशी ६ जुलैला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एकादशीला पंढरपूरात महापूजेसाठी उपस्थित राहणार आहेत. मुख्यमंत्री आतापर्यंत योग्य वेळी कर्जमाफी देऊ असेच सांगत आहेत. आता त्यांनी पांडूरंगालाच कर्जमाफीची तारीख सांगवी, अशी टिका प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी केली. तसेच शेतकऱ्यांच्या

पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२७ जुन २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६८.५० क्विंटल | २,३९० | २,८९२ | २,५७८ |
| ज्वारी/हायब्रिड : ४७.०० क्विंटल | २,००० | २,७४० | २,४७९ |
| मका/लोकल:८.५० क्विंटल | २,२२५ | २,२२५ | २,२२५ |
| तूर : १८.०० क्विंटल | ५,७५१ | ६,३५० | ६,०९२ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ३१.५० क्विंटल | १,९५१ | २,६५१ | २,३८४ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन:९.५० क्विंटल | ४,२५१ | ४,२५१ | ४,२५१ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,३८० | ५,६९० | ५,४९० |

# जगाला हिरव्या मशालींची गरज-सिने अभिनेते सयाजी शिंदे

### श्रीक्षेत्र रामगडावर १० एकर मध्ये फुलणार सह्याद्री देवराई, सयाजी शिंदे यांच्या हस्ते ७५ झाडे लावून वृक्ष लागवडीला सुरूवात



**बीड । प्रतिनिधी**

जगाला आपल्याकडून काही देता आलं तर ते वृक्ष लागवडीतून देता येईल. सध्या जगाला हिरव्या मशालींची गरज आहे. त्यामुळे प्रत्येकानी आपल्या आई–वडिलांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या वाढदिवसा येवढे झाडे लावली पाहिजेत. असे आवाहन सिने अभिनेते सयाजी शिंदे यांनी केले. बीड तालुक्यातील श्री क्षेत्र रामगड येथे १० एकर मध्ये फुलणाऱ्या

पान २ वर

### लेखक अरविंद जगताप यांच्या वडिलांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त ७५ झाडांची लागवड

श्री क्षेत्र रामगड येथे होणाऱ्या देवराई प्रकल्पाची सुरूवात लेखक अरविंद जगताप यांच्या वडिलांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त येथे वेगवेगळ्या जातीचे ७५ झाडे लावून सिने अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते सुरूवात करण्यात आली. प्रत्येकानी आपल्या आई–वडिलांच्या वाढदिवसानिमित्त असा उपक्रम राबवावा असे आवाहन सयाजी शिंदे यांनी यावेळी केले.

### अगोदर डोक्यात झाड लावा, नंतर जमिनित– शिवराम घोडके

वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकानी अगोदर डोक्यात झाड लावलं पाहिजे. जोपर्यंत आपल्या डोक्यात झाड लावून जगवण्याची संकल्पना उतरणार नाही. तोपर्यंत जमिनीत झाडे लागणार नाहीत. त्यामुळे अगोदर आपल्या डोक्यात झाडे लावा. वृक्ष लागवड ही सह्याद्री देवराई, वनविभाग, रामगड आणि भक्तांच्या सहकार्यातून होत आहे. सह्याद्री देवराईचे काम पूर्ण झाल्यानंतर आलेल्या प्रत्येक भाविकाला प्रसाद म्हणून रामगडावर झाड दिले जाणार आहे. भाविकांनी ते झाड आपल्या शेतात लावावे.

### सिता वन, राम वन, पंचवटी होणार

येथे विविध जातीचे वृक्ष लागवड केली जाणार आहे. त्यामध्ये वेगवेगळे वृक्ष असणार आहेत. गडाजवळ कमी उंचीचे त्यापुढे मोठ–मोठे असे वृक्ष लागवड होणार आहे. विशेष म्हणजे येथे सिता वन, राम वन अणि पंचवटी वन तयार करण्यात येणार आहे.

### एका झाडामध्ये १५ फुटाचे अंतर २० फुटाचा असणार रस्ता

१० एकर मध्ये झाडे लावताना त्याचा अभियंत्यामार्फत पूर्ण प्लॅन तयार करून घेण्यात आला आहे. येथे विविध कार्यक्रमाला आलेल्या नागरिकांना सहज झाडाच्या सावलीला बसता येईल झाडाखाली वाहन पार्क करता येईल. वाहन पार्किंगच्या ठिकाणी दोन्ही झाडांच्या मध्ये २५ फुटांचे अंतर ठेवण्यात येणार आहे. प्रत्येक झाडामध्ये १५ फुटाचे अंतर असणार असून मध्ये २० फुटाचे रस्ते बनवण्यात येणार आहेत.

cmyk

अग्रलेख

# मराठी माणसांमधील एकी, ही काळाची गरज

महाराष्ट्र सरकारच्या हिंदीकरणाविरोधात एकत्र येण्याची मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे व ठाकरेसेनेचे नेते उद्धव ठाकरे यांनी घेतलेली भूमिका ऐतिहासिकच म्हटली पाहिजे. मुळात मराठीकरिता दोन भाऊ आपले राजकीय मतभेद विसरून सोबत येणे, ही समस्त मराठी जनांकरिता सुखावह बाब ठरते. त्यामुळेच येत्या ५ जुलैला मुंबईत काढण्यात येणाऱ्या एकत्रित मोर्चाकडे राज्यासह संपूर्ण देशाचे लक्ष असेल. अलीकडेच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. याबद्दल सांप्रत सरकार निश्चितच अभिनंदनास पात्र होय. परंतु, याच सरकारच्या काळात येनकेनप्रकारेण येथील जनतेवर हिंदी लादण्याचा प्रयत्न होत असेल, तर त्यास विरोध करणे क्रमप्राप्त ठरते.

महाराष्ट्राला संतविचारांचा आणि छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाचा वारसा लाभला आहे. प्रत्येकाच्या विचारांचा, संस्कृतीचा, भाषेचा आदर करणे, ही महाराष्ट्राची संस्कृतीच आहे. त्यामुळे दक्षिणेत जसा हिंदीला विरोध झाला, तसा तो महाराष्ट्रात कधी झालेला नाही. दैनंदिन जीवनामध्ये मराठी माणूस मराठी, इंग्रजी, हिंदी यांसारख्या भाषांचा सर्रास वापर करतो. याशिवाय अन्य भाषा शिकण्याकडे किंवा समजून घेण्याकडेही मराठी माणसाचा कल असतो. कोणत्याही भाषेचा द्वेष वा तिरस्कार महाराष्ट्राने कधीही केलेला नाही, याचेच हे द्योतक. किंबहुना, मराठी माणसाच्या या उदारमतवादी भूमिकेचा गैरफायदा घेऊन प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे त्याच्या मानगुटीवर हिंदी भाषा बसवण्याचा दिल्लीकरांचा डाव लपत नाही. पहिलीपासून हिंदीचे सक्तीकरण, हा त्याचाच भाग. अर्थात सार्वत्रिक विरोधानंतर ही सक्ती मागे घेण्यात आली असली, तरी त्रिभाषा सूत्रातून जी लबाडी करण्यात आली, त्याला तोड नसावी. तिसरी भाषा म्हणून इतर भाषांचाही पर्याय असल्याचे सांगायचे आणि त्याकरिता २० मुलांची अट ठेवायची, हे म्हणजे हिंदी अनिवार्य करण्यासारखेच म्हणता येईल. या पार्श्वभूमीवर मराठी अभ्यास केंद्र, मनसे, ठाकरे सेना यांच्यासह समस्त मराठीप्रेमींनी त्याविरोधात घेतलेली आक्रमक भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. प्रारंभी येत्या ६ जुलैला गिरगाव चौपाटीवरून राज ठाकरेंच्या मनसेचा मोर्चा निघणार होता. तर मराठी अभ्यास केंद्राने ७ जुलैला आझाद मैदानावर पुकारलेल्या आंदोलनात उद्धव ठाकरे सहभागी होणार होते. परंतु, अशा स्वतंत्र मोर्चा वा आंदोलनातून मराठी माणसांमधील दुही वा गटतटच दिसले होते. हे पाहता ठाकरे बंधूंनी या मुद्द्यावर एकत्र येण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. मराठीसाठी सर्व पक्षीयांनी पुढे आले पाहिजे, असे राज ठाकरे हे मागच्या अनेक दिवसांपासून सातत्याने सांगत आहेत. त्यापुढे जाऊन राज यांनी एकत्रित मोर्चा काढण्याचा प्रस्ताव मांडणे, त्याला उद्धव ठाकरे यांनी तात्काळ संमती देणे आणि आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर मोर्चाकरिता ५ जुलै ही तारीख निश्चित करणे, यामध्ये अनेक अर्थ दडलेले दिसतात. खरे तर राज आणि उद्धव ठाकरे यांच्या मनोमीलनाच्या चर्चा आजवर अनेकदा झाल्या आहेत. परंतु, त्या केवळ चर्चाच ठरल्याचे दिसून येते. त्यामुळे ५ जुलैला ठाकरे बंधूद्वय हिंदीच्या मुद्द्यावर सरकारविरोधात रस्त्यावर उतरणे, ही महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्त्वपूर्ण घटना मानता येईल. आगामी महापालिका निवडणुका तोंडावर आल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक लक्षवेधक निवडणूक असेल, ती मुंबई महानगरपालिकेची. मुंबई महापालिका ही सोन्याची अंडे देणारी कोंबडी म्हणून ओळखली जाते. स्वाभाविक या खेपेला सर्वशक्तिनिशी मुंबई खेचून आणायचा भाजपाचा प्रयत्न असेल. ठाकरे बंधू एकत्र आले, तर भाजपाच्या मार्गात अडथळे निर्माण होऊ शकतात. हे बघता मोर्चाआधीच त्रिभाषा सूत्राचे धोरण बासनात गुंडाळले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. दोन भाऊ एकत्र यावेत, असे भाजपाला वाटायचे काही कारण नाही. उलट ते जितके दूर राहतील, तितके त्यांना बरे. त्यामुळे मोर्चातील हवा काढण्यासाठी त्यांच्याकडून अशी खेळी खेळली जाऊ शकते. अर्थात काही झाले, तरी ठाकरे बंधूंच्या ते पथ्यावरच पडू शकते. उद्या सरकारने निर्णय मागे घेतला, तरी त्याचे श्रेय ठाकरे बंधूंना घेता येईल. दोन भावांनी मिळून सरकारला नमवल्याचा संदेश त्यातून जनमानसात जाऊ शकतो. दुसऱ्या बाजूला मोर्चा झाला, तर आयतीच शक्तिप्रदर्शनाची संधी ठाकरे बंधूंना मिळेल. सध्या या सगळ्यावर एकनाथ शिंदे यांनी काहीशी सावध भूमिका घेतली आहे. जे काही बोलत आहेत, ते भाषामंत्री उदय सामंत. माशेलकर समितीच्या अहवालाबद्दल तेच बोलले. उद्धव ठाकरे यांच्याच काळात माशेलकर समितीचा अहवाल स्वीकारला गेल्याचे ते म्हणतात. पण, त्याची अंमलबजावणी ठाकरे सरकारने केली नव्हती, हे ते विसरतात. हे पाहता त्यांचा बोलविता धनी कोण असणार, याची कल्पना येते. सामंत आणि शिंदे यांच्यातील अंतर वाढत असल्याच्याही चर्चा आहेत. त्यात सामंतांना खेचून भाजप नेतृत्व मराठीच्या मुद्द्यावर अंतर्विरोध तर निर्माण करत नाही ना, अशा शंका घेण्यासही वाव आहे.

मुंबईत गुजराती, मारवाड्यांसोबत यूपी, बिहारींची संख्याही लक्षणीय आहे. यातील गुजराती, मारवाडी हा टोटल भाजपाचा मतदार. योगी पर्वामुळे यूपी, बिहारीही प्रामुख्याने भाजपकडे वळले आहेत. या वर्गाला खूष करण्यासाठीच पहिलीपासून हिंदी आणणे इतकाच राज्यकर्त्यांचा सीमित हेतू असेल, असे वाटत नाही. सध्या उत्तर भारतावर भाजपाने राजकीय, सांस्कृतिकदृष्ट्या पूर्ण कब्जा केला आहे. त्यामुळे मूळ मराठी संस्कृतीवर आक्रमण करायचे, महाराष्ट्र सांस्कृतिकदृष्ट्या उत्तर भारताला ॲटॅच करायचे आणि त्यातून आपले राजकारण आणखी पुढे न्यायचे, असा भाजपाचा अजेंडा असल्याची मांडणी केली जात आहे. तसे असेल, तर हा गंभीर विषय म्हणता येईल. राष्ट्रभाषा म्हणून भाजपाने नेहमीच हिंदीचा पुरस्कार केला आहे. महाराष्ट्रालाही हिंदीबद्दल कधीच द्वेष नव्हता, नाही. तथापि, हिंदीला प्राधान्य देऊन मराठीचे महत्त्व कमी करण्याचे षड्यंत्र रचले जात असेल, तर मराठी माणसाला वज्रमूठ आवळावीच लागेल. त्यादृष्टीने ठाकरे बंधू व पर्यायाने मराठी माणसांमधील एकी, ही काळाची गरजच ठरते.

## पद्मश्री पुरस्कार विजेत्या साधूवर बलात्काराचा गंभीर आरोप

**कोलकाता। प्रतिनिधी**



**पश्चिम बंगालमधून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील एका महिलेने भारत सेवाश्रम संघाचे साधू आणि पद्मश्री पुरस्कार विजेते कार्तिक महाराज यांच्यावर तब्बल १२ वेळा बलात्कार केल्याचा गंभीर आरोप केला आहे.**

नोकरीचे आमिष दाखवून आश्रमात बोलावून हे घृणास्पद कृत्य केल्याचे महिलेने आपल्या तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणामुळे राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, ही घटना २०१३ सालची आहे. कार्तिक महाराज यांनी तिला मुर्शिदाबाद येथील एका आश्रमाच्या शाळेत शिक्षिकेची नोकरी देण्याचे आश्वासन दिले होते. त्यासाठी तिला आश्रमात राहण्याची सोयही करून देण्यात आली. मात्र, एके रात्री महाराज तिच्या खोलीत घुसले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केले, असा दावा महिलेने केला आहे. जानेवारी ते जून २०१३ या सहा महिन्यांच्या कालावधीत महाराजांनी तिच्यावर किमान १२ वेळा बलात्कार केल्याचे तिने म्हटले आहे.

### अंतरवाली येथे बैठकीसाठी जाणाऱ्या मराठा बांधवासाठी आनंद काळे यांच्या वतीने खिचडी वाटपाचे आयोजन

# जातीपातीच्या पलीकडे समाजकार्य करणारा युवक- आनंद काळे

## ●जरांगे पाटलाच्या प्रत्येक आंदोलनासाठी खिचडी, पाणी, गाड्यांची केली होती व्यवस्था

**वडवणी । प्रतिनिधी**

**अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाच्या आरक्षणसाठी संघर्ष योद्धा मनोज सारंगे पाटील यांनी निर्णय बैठकीचे आयोजन दि.२९/६/२०२५ रोजी रविवारी या दिवशी आंतरवाली सराटी होते आयोजन करण्यात आले आहे या बैठकीला जाण्यासाठी केव्हा गावातून मराठा बांधव जाणार आहे त्यांच्या सकाळी नाश्त्याची व पाण्याची व्यवस्था ओबीसी समाजाचे युवा नेते मराठा समाजाच्या प्रत्येक आंदोलनात समाज कार्य करणारे आनंद भैय्या काळे व मित्र मंडळ च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक वडवणी येथे खिचडी व पाणी वाटपाचे आयोजन करण्यात आले होते तरी महा बैठकीसाठी जाणाऱ्या सर्व मराठा बांधवाने नाश्ता करूनच पुढे जावे असे आवाहन आनंद भैय्या काळे यांनी केले आहे.**

मराठा समाजाला सरसकट ओबीसीतील आरक्षण मिळावे यासाठी गेल्या दोन वर्षापासून संघर्ष होता म्हणून तरंगे पाटील हे वेळोवेळी आंदोलन करत आहेत मात्र शासनाने त्याची दखल न घेतल्यामुळे २९ ऑगस्टला मुंबई आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे त्यामुळे मोर्चाचे नियोजन करण्यासाठी दिनांक २९ जून रोजी अंतरवाली सराटी येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले



आहे या बैठकीसाठी संबंध वडवणी तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर मराठा युवक जाणार आहे त्यांना सकाळी ८ ते १२ या वेळेत खिचडीचा नाश्ता व पाणी वाटप चे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आनंद भैय्या काळे व मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे तरी या मार्गाने येणाऱ्या सर्व मराठा बांधवांनी नाश्ता करूनच जावे असे आभार मराठा समाज बांधवांना केली आहे.मराठा समाजाच्या प्रत्येक आंदोलनात सिंहाचा वाटा उचलणारे ओबीसी चे नेते आनंद काळे यांनी या अगोदरही खिचडी वाटप पाणी वाटप गाड्यांची व्यवस्था यासह अनेक समाज कार्य केले आहे त्याचाच भाग म्हणून या आंदोलनातही ते मागे राहिले नाही त्यांनी या अगोदरही आंतरवाली सराटी येथे जाऊन जरंगे पाटलाच्या प्रत्येक आंदोलनात सहभाग नोंदवला त्यांच्या हॉस्पिटलमध्ये जाऊन तब्येतीची विचारपूस करणे, बीडला आल्यावर सत्काराचे आयोजन करणे एक प्रकारे जरांगे पाटलावर आनंद काळे यांचे नितांत प्रेम करणारा हा माणूस आहे कुठलाही जातीभेद न करता सर्व समाजाचे आपण देणे लागतो या भावनेने त्यांनी उद्याच्या बैठकी ला जाणाऱ्या मराठा बांधवाची गैरसोय होऊ नये म्हणून खिचडी पाणी वाटप करण्याचे आयोजित केले आनंद भैय्या काळे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे तरी मराठा समाज बांधवांनी नाश्ता करूनच पुढे जावे असे आवाहन केले आहे.

# बळीराजा तुझ्या हाकेला ओ द्यायला सदैव मी तयार–तहसीलदार शेळके

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे जिल्हाभरात विविध तालुक्यांना भेटी देत आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक हे सुद्धा विमुक्त भटके बांधव असतील अथवा इतर नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी सदैव तयार असतात . त्याचप्रमाणे बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि त्यांची संपूर्ण टीम रस्त्याची कामे असो अथवा पंचनामे असो यासाठी सदैव शेतात , रानावनात फिरत असते.**

असाच एक रस्ता सरस्वती शाळा ते आहेर धानोरा ते वरवटी . आहेर धानोरा तसे बीड शहरालगतच असलेले गाव . तथापि शालेय विद्यार्थ्यांना , गावकऱ्यांना धड रस्ता नाही अशी गत . शासनाच्या महाराजस्व योजनेत , सस्ती अदालत योजनेंतर्गत पांदण रस्ता , शिव रस्ता मोकळा करणे , अतिक्रमण विरहित करणे इत्यादी मोहिमा राबविण्यात येत आहेत . शहरातील खातेदार शेतकरी व दोन्ही गावचे शेतकरी यांचेशी चर्चा करुन तहसीलदार शेळके यांनी शुक्रवारी हा रस्ता मोकळा केला . रस्त्यातील लहान झाडे झूडपे काढल्याने रस्त्याने मोकळा श्वास घेतला . खुणा व हद्दी निश्चित करून रीतसर मोजणी करून रस्ता पूर्ण होणार आहे . हा रस्ता ग्रामीण मार्ग असून जिल्हा परिषद बांधकाम विभाग , उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून हद्दी खुणा करून नियमानुसार रस्ता रुंदीकरण करून घ्यावे अशा सुचना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सर्व शेतकरी बांधव यांना दिल्या . किरकोळ असलेले अतिक्रमण काढल्यामुळे रस्ता मोकळा होऊन गावातील दुध विक्रेते , शाळेतील विद्यार्थी , आजारी रुग्ण , शेती वहिवाट



करणारे शेतकरी , असे सर्व जण यांची सोय झाली आहे . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , निवासी उपजिल्हाधिकरी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी प्रत्यक्ष येऊन हा रस्ता काढून दिला . यावेळी समवेत मंडळ अधिकारी बीड अनिल तांदळे , तलाठी सचिन एरंडे , शब्बीर पठाण , शशांक कुलकर्णी हे होते . आहेर धानोरा गावचे सरपंच बाळासाहेब इंगोले , अमोल इंगोले , बाबुराव पिंगळे , आनंद पिंगळे , दत्ता आदमाने , संदीप आदमाने सर्व बीड उपस्थित होते. शुक्रवारी असाच एक ढेकनमोह ते पिंपळनेर एक वर्षांपासून अडवलेला रस्ता सस्ती अदालत अंतर्गत मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे यांनी समोपचाराने खुला केला . अंदाजे एक किलोमीटर लांबीचा , ५ ते ७ फूट रुंदीचा रस्ता हा ३.५ मीटर रुंद करून खुला करण्यात आला . यावेळी गावाकऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानले . यावेळी पी.एस.आंधळे , मंडळ अधिकारी नाळवंडी , जे.जी.शेख ग्राम महसुल अधिकारी ढेकणमोहा , शिवाजी गाडीवान सरपंच , सतिश देवकते ग्रा.प.सदस्य , संतोष जाधव ग्रा.प.सदस्य , कैलास देवकते तंटामुक्ती अध्यक्ष , सर्जेराव जाधव , सखाराम जाधव , भगवान थापडे , जगन्नाथ थापडे , भागवत थापडे , सुभाष भिताडे , जालिंदर भिताडे , राजेंद्र भिताडे , गोविंद जाधव , शिवाजी जाधव , जोतिराम जाधव , मुकेश पिंगळे , रमेश गलांडे , गणेश गलांडे , बळीराम थापडे , कृष्णा पिंगळे , मनोहर देवकते , बाबु जाधव , मिलिंद शिंदे , चत्रभुज थापडे , विश्वनाथ भिताडे , श्रीराम थापडे , दिनेश पिसाळ , दिनकर येवले , अनंत करांडे ग्रा.प.सदस्य , कैलास थापडे , विलास थापडे इ.शेतकरी उपस्थित होते . बीड तालुक्यात इतक्या मोठ्या प्रमाणात शेत रस्ते , बंद रस्ते मोकळे होण्याची ही किंबहुना पहिलीच वेळ असावी . दोन दिवसांपूर्वी मूळुक मसेवाडी येथील शेतकऱ्यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे अभिनंदन करत आभार मानले . असे तहसीलदार मिळाले तर तालुक्यातील जनतेचे प्रश्न तात्काळ सुटण्यास मदत होईल , असे मत शेतकरी व्यक्त करीत आहेत.

## पान १ वरून...

### परभणी जिल्ह्यात शक्तीपीठ

सरकारने त्यांच्या जमिनीऐवजी दुसरा मार्ग शोधावा. या बैठकीत शेतकऱ्यांनी आपली एकजूट दाखवली आणि सरकारला त्यांच्या मागण्यांकडे लक्ष देण्याची मागणी केली.

-----------

### शिंदेंनी भाजपला अडचणीत

उलट ते सध्या आमच्यावरच आरोप करत आहेत, कुठल्या नशेत आहेत कुणास ठावूक? कारण गेल्या तीन वर्षात राज्यात दोन वेगळे मुख्यमंत्री झालेत. सरकारमध्ये ते स्वतः बसलेत पण आरोप आमच्यावर करत आहेत. मविआच्या अहवालाची भाजप स्वतः उद्या होळी करणार आहे. यावर बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, ''जरुर करा पण तुम्ही स्वतःच्या सरकारविरोधात आंदोलन करत आहात की फडणवीसांच्या विरोधात आंदोलन करत आहात? कदाचित भाजपमध्येच अंतर्गत वाद तर नाहीत ना? भाजपमध्ये दुसरे कोणी मंत्री आहेत का की ज्यांना फडणवीसांची जागा पाहिजे. यांनी परवा सक्तीचा जीआर काढला, कुठल्या धुंदीत आहेत हे लोक. हिंदी सक्तीचा जीआर हा भाजपच्या सरकारने अन् एकनाथ शिंदेंच्या मंत्र्याने काढला आहे. कदाचित शिंदेंनाच फडणवीसांना अडचणीत आणायचे नाही ना? फडणवीसांच्या विरोधात त्यांच्या सरकारमध्ये कोण काम करतेय? हे त्यांनी ओळखावे. आपण सर्वजण भारतीयच आहोत. फक्त विषय इतकाच आहे की, थोडसे स्वार्थाचे राजकारण बाजुला ठेवून हा विचार करा की तिसरी भाषा तुम्ही खरोखरच पहिलीच्या विद्यार्थ्यांवर लादणार आहात का? नरसिंहराव पंतप्रधान होते पण त्यांना आधीपासूनच पंधरा ते सोळा भाषा बोलता यायच्या. या सर्व भाषा शिकायलाच हव्यात अशा सक्तीच्या शाळेत गेलो होते का? वाजपेयी आणि शशी थरुर यांनाही अनेक भाषा येतात, ते ही सक्तीची भाषा शिकवणाऱ्या शाळेत गेले होते का? असं उदाहरणही आदित्य ठाकरे यांनी यावेळी हिंदी सक्तीच्या मुद्दयावर दिले.

------------

### दोषी विजय पवारला राजकीय

झाल्यानंतर तो लोकप्रतिनिधीच्या घरी गेला आणि त्यानंतर फरार झाला, असे सांगत यंत्रणेवर दबाव टाकला गेला का, याची चौकशी करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले. शिक्षण क्षेत्रात पवारचा दबदबा असून, याआड आर्थिक गैरव्यवहार, जमीन घोटाळे व क्लासेस चालक व विद्यार्थ्यांना त्रास देण्याचे प्रकार घडले आहेत. या घटनेमुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, बीडमध्ये शनिवारी शैक्षणिक बंद पाळण्यात आला. सोमवारी जाहीर करण्यात आलेल्या जिल्हा बंदमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ.क्षीरसागर यांनी केले. पीडित मुलगी मानसिकदृष्ट्या खचली असून, तिच्या कुटुंबीयांनी पुढे येऊन आवाज उठवावा, तसेच हा लढा सर्वांचा व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करून पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी स्वतः पुढाकार घेणार असल्याचे डॉ. योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.

**राजकारण बाजूला ठेवून एकत्र येण्याचे आवाहन**

पोलीस अधीक्षकांकडून तसेच पीडितेच्या कुटुंबियांकडून माहिती घेतली असून, संपूर्ण प्रकरण पालकमंत्र्यांसमोर मांडले जाणार आहे. पवारचे सीडीआर तपासणे, सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेणे आणि आरोपीवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे डॉ.क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. राजकारण बाजूला ठेवून आरोपीला वाचवण्याचा कोणताही प्रयत्न होऊ नये, यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

----------

### अण्णासाहेब पाटील आर्थिक

तालुकास्तरावर देखील महामंडळाच्या योजना पोहोचविण्यासाठी आगामी काळात दौरे करण्यात येणार असल्याचे पाटील म्हणाले.

---------

### हिंदी सक्तीला विरोध,

सन्मानच आहे. पण सक्ती चालणार नाही. मराठी फक्त भाषा नाही तर आमची जीवनपद्धती आहे. काही राजकीय पक्ष, संघटना व संस्था आपापल्या पद्धतीने या निर्णयाचा विरोध करत आहेत. हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर काँग्रेस पक्षाच्यावतीने मी साहित्यिकांना पत्र लिहून आवाहनही केले आहे. हिंदी भाषेबाबत घेतल्या निर्णयाला आमचा विरोध आहे. पण ५ जुलै रोजी होणारा मोर्चा सर्व काही आहे असे काही नाही. मोर्चाला आमच्या शुभेच्छा. हिंदी सक्तीच्या विरोधात असे अनेक आंदोलन होत आहेत, त्यामुळे याही मोर्चाला आमच्या शुभेच्छा, असे त्यांनी नमूद केले. एकीकडे महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी हिंदी भाषा संदर्भात सरकारने घेतलेल्या निर्णयाचा विरोध करण्यासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या मोर्चाला पाठिंबा दिला आहे. तर दुसरीकडे काँग्रेस या मोर्चापासून दूर राहणार असल्याचे चित्र सध्या तरी दिसत आहे. हिंदी सक्तीविरोधात मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. ठाकरेंची शिवसेना आणि मनसेचा एकत्रित मोर्चा ५ जुलैला निघणार आहे. यामुळे या निमित्ताने उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार आहेत.

---------

### कर्जमाफीची तारीख मुख्यमंत्र्यांनी

प्रश्नांवर 'सातबारा कोरा करा' या पदयात्रेचेही त्यांनी घोषणा केली.

बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी नुकतेच आंदोलन केले. शेतकऱ्यांची कर्जमाफी हे या आंदोलनाची मुख्य मागणी होती. शेतकरी कर्जमाफीची मागणी करत असताना मुख्यमंत्री मात्र याविषयी स्पष्ट बोलत नाहीत. योग्य वेळी कर्जमाफी देऊ, असेच मुख्यमंत्री सांगत आहेत. यावरून बच्चू कडू यांनी मुख्यमंत्र्यांवर टिका केली. ते म्हणाले की, ''योग्य वेळी कर्जमाफी दिली जाईल, असे सांगत सरकार केवळ वेळ पुढे ढकलत आहे. पण ही योग्य वेळ कधी येणार, हे अजूनही स्पष्ट नाही. शासनाकडून फक्त आश्वासने दिली जात आहे. मात्र प्रत्यक्षात निर्णय लांबणीवर पडत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटत आहे.'' ''कर्जमाफी न मिळाल्याने शेतकरी मोठ्या संकटात आहेत. शेतकऱ्यांकडून सरकार विरोधात नाराजी व्यक्त होत आहे. यावेळी शेतकऱ्यांना मदतीची गरज आहे. पण योग्यवेळी मदत मिळत नसल्याने शेतकरी आत्महत्या करत आहेत. त्यामुळे सरकारने आता वेळ वाया न घालवता लवकरात लवकर योग्य निर्णय घ्यावा,'' असे कडू यांनी स्पष्ट केले.

**७ ते १४ जुलैपर्यंत 'सातबारा कोरा करा' पदयात्रा**

'सातबारा कोरा करा' ही १३८ किलोमीटरची पदयात्रा शेतकरी, शेतमजूर, विधवा, दिव्यांग, बेरोजगार तरुण आणि इतर वंचित घटकांच्या न्याय हक्कांसाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वात काढण्यात येणार आहे. मात्र आषाढी एकादशीमुळे पदयात्रेच्या तारखेत थोडा बदल करण्यात आला असून ती आता ५ जुलै ऐवजी ७ जुलैपासून १४ जुलैपर्यंत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ''सरकारकडे केलेल्या मागण्या फक्त आमच्या पक्षाच्या नाहीत, त्या शेतकरी, गरीब आणि वंचित घटकांच्याही आहेत. त्यामुळे सरकारने या मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात,'' अशी ठाम मागणी बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा स्पष्टपणे मांडली आहे. या पदयात्रेचा उद्देश केवळ सरकारला जागे करणे नसून २ ऑक्टोबर रोजी मोठ्या राज्यव्यापी आंदोलनाची तयारी करून शेतकरी प्रश्नांवर निर्णायक लढा उभारण्याचा निर्धार या मागे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका फेब्रुवारीत होण्याची शक्यता असल्याने आचारसंहितेचा कोणताही अडसर या आंदोलनावर येणार नाही, असे बच्चू कडू यांनी सांगितले.

-----------

### सरन्यायाधीश पदापर्यंतच्या प्रवासात नागपूरचे

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, न्यायमूर्ती अतुल चांदूरकर, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, ज्येष्ठ न्यायमूर्ती अनिल किलोर, न्यायमूर्ती अभय मंत्री आणि नागपूरचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश दिनेश सुराणा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले, नागपूर जिल्हा व सत्र न्यायालयाने देशाला महान वकील व न्यायाधीश दिले. जिल्हा वकील संघटनेच्या माध्यमातून रचनात्मक कार्य उभे राहिले आणि उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाद्वारे जनहित याचीकांचा प्रभावी उपयोग होवून जनहिताचे कार्य झाले. या तीनही संस्थांमध्ये कार्य करण्याची संधी मिळाली. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी विराजमान होताच विदर्भातील झुडपी जंगलाचा प्रश्न सोडवून यामाध्यमातून गोरगरीब आणि शेतकऱ्यांना न्याय देता आला. याचे समाधान असल्याचे आवर्जून सांगितले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात घटना समितीच्या सदस्यांनी भारत देशाला अभूतपूर्व अशी राज्यघटना दिली. समता, न्याय, स्वातंत्र्य आणि बंधूता या मुल्यांद्वारे राज्यघटना देशाला मार्गदर्शन करीत असून सामान्य व्यक्तीच्या अधिकाराचे रक्षण न्यायपालिका करीत असल्याचे त्यांनी सांगितले. न्यायपालिकेच्या सर्वोच्च पदाची जबाबदारी सांभाळतांना प्रत्येकाला न्याय देण्याची भूमिका कायम ठेवणार असल्याच्या भावनाही त्यांनी व्यक्त केल्या. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाच्या आदेशानुसार सन २००१ मध्ये झोपडपट्टया काढण्याच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात स्थगिती देण्यात बजावलेल्या भूमिकेची आठवण सांगत हजारो झोपडपट्टी वासीयांचा निवारा वाचवू शकल्याच्या भावना त्यांनी मांडल्या. नागपूर येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठ उभारण्यात यश आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. विधी क्षेत्रातील एकूण ४० वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सहकार्य लाभलेल्या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते जिल्हा व सत्र न्यायालयाच्या विस्तारित इमारतीमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राचे अनावरण आणि इमारतीच्या परिसरात तीन भाषांमधील संविधान उद्देशिकेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला त्यांच्या हस्ते डिजिटल ग्रंथालयाचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. नागपूर जिल्हा वकील संघटना आणि विदर्भातील विविध विधी संघटनांच्या वतीने यावेळी न्या. गवई यांचा सत्कार करण्यात आला. नागपूर जिल्हा वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. रोशन बागडे यांनी प्रास्ताविक केले तर सचिव मनिष रणदिवे यांनी आभार मानले.

-----------

### जगाला हिरव्या मशालींची

सह्याद्री देवराई प्रकल्पाची सुरूवात त्यांच्या हस्ते ७५ झाडे लावून करण्यात आली. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. शहरातील हॉटेल ऑलिव्ह येथे शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये सिने अभिनेते सयाजी शिंदे बोलत होते. यावेळी लेखक अरविंद जगताप, सह्याद्री देवराई समन्वयक शिवराम घोडके यांची उपस्थिती होती. शहरापासून पाच किलो मीटर अंतरावर असलेल्या पालवनच्या डोंगरावर २०१६-१७ मध्ये सिने अभिनेते सयाजी शिंदे, अरविंद जगताप, शिवराम घोडके यांनी वन विभागाच्या २५० एकरमध्ये १ लाख ६४ हजार विविध जातीचे वृक्ष लावून ३ एकर मध्ये ३ घन वन तयार केलेले आहे. त्याच धर्तिवर बीड पासून ७ किलो मीटर अंतरावर असलेल्या रामगडावर १० एकर मध्ये देवराई २ होणार आहे. येथे विविध सुगंधी, पक्षी बसणारे, औषधी, फळ, सावली देणारे १० हजार वृक्ष लावण्यात येणार आहेत. तर ४० गुंठ्यामध्ये २ घन वन प्रकल्पाचे काम १५ रोजी मे पासून सुरू झाले आहे. आतापर्यंत येथे ५ हजार खड्डे जेसीबीच्या सहायाने खोदण्यात आले आहे. या प्रकल्पाची माहिती देण्यासाठी अभिनेते सयाजी शिंदे यांनी पत्रकार परिषद घेवून माध्यमांशी संवाद साधला. श्री क्षेत्र रामगड येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी साळवे, डॉ. प्रदीप शेळके, सुहास वायंगणकर, सागर साठे,माजी सरपंच कोंडीराम निकम, शरद निकम हे उपस्थिती होते.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. २९ जून २०२५



## हिंदी भाषेच्या सक्ती विरोधातील आंदोलनास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे-जिल्हाप्रमुख वरेकर



बीड : पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायक राऊत, संपर्कनेते सुनिल प्रभू साहेब, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब, संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या नेतृत्त्वाखाली महाराष्ट्र शासनाने इयत्ता १ली पासून हिंदी भाषा हि सक्तीची केली आहे, एवढ्या कमी वयात लहान मुलांना हे खुप मोठे ओझे होत आहे तसेच पर्यायाने मराठी भाषेचे प्रभुत्व कमी होणार आहे,या महायुतीच्या शासनाचा हा डाव हाणून पाडण्यासाठी येत्या रविवार दि. २९/६/२०२५ रोजी दुपारी ठिक ३ वाजता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे बीड जिल्हा पक्षाच्या वतीने बीड शहरातील महामानव राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर शासनाच्या जी.आर.ची भव्य होळी करण्यात येणार आहे तरी या अन्यायाविरुद्ध व हा निर्णय रद्द होण्यासाठी जिल्ह्यातील सर्व पक्षांचे लोकप्रतिनिधी,कलावंत ,शिक्षक , डॉक्टर, इंजिनिअर, वकील, सर्व स्तरातील मान्यवर व शिवसेनेचे पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना, किसान सेना व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांनी केले आहे.

# आता शेतकऱ्याला कृषी पंपासाठी वीज दिवसा मिळणार -आ.सुरेश धस

## आठ वीज उपकेंद्रासाठी ५ आणि १० एम.व्ही.ए. चे ट्रान्सफॉर्मर उपलब्ध

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी मतदार संघात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० अंतर्गत नवीन अतिरिक्त ८ सब स्टेशनला ५ व १० एम.व्ही.ए. चे ट्रांसफार्मर मतदारसंघासाठी उपलब्ध झाले असल्याने यापुढे आता कृषी पंपासाठी शेतकऱ्याला दिवसा वीज पुरवठा होणार असल्याची माहिती आ.सुरेश धस यांनी दिली याबद्दल मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० अंतर्गत आष्टी मतदार संघातील ८ सबस्टेशनला ५ एम.व्ही ए. चे अतिरिक्त नवीन ट्रान्सफर मंजूर होऊन ते मतदारसंघात दाखल झाले असून या सबस्टेशनला उच्च दाबाने पुरवठा होणार आहे पारगाव जोगेश्वरी,शिराळ,टाकळी अमिया,वाहिरा,पिंपळा तसेच शिरूर तालुक्यातील मानूर



टाकळी,तिंतरवणी या सबस्टेशनला अतिरिक्त ५ एम. व्ही.ए.चे तर ब्रम्हनाथ येळंब या सबस्टेशनला १० एम. व्ही.ए.चे ट्रांसफार्मर दाखल झाले आहेत. पाटोदा तालुक्यातील सबस्टेशन प्रस्तावित आहेत तेही लवकर मंजूर होतील त्यासाठी पाठपुरावा चालू आहे.त्यामुळे शेतकऱ्याला आता दिवसा वीजपुरवठा होणार असून शेतकऱ्याचा रात्री अपरात्री शेतात जाण्याची गरज राहणार नाही त्यामुळे होणारे नैसर्गिक अपघात कमी होणार आहेत.विद्युत रोहित्र जळण्याचे प्रमाण देखील कमी होणार आहे.तसेच उच्च दाबाने पुरवठा होणार असून या योजनेअंतर्गत सोलर प्लांट उभारणार असून यातून सबस्टेशन वीजपुरवठा होणार आहे.काही ठिकाणी सोलर प्लॅन्टचे काम प्रगतीपथावर असून जागा संपादनाचे कामे पूर्ण प्रगतीपथावर आहेत.

### मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेला शब्द पाळला -आ.धस

राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांच्या कृषी पंपाला दिवसा पुरवठा करणार.. सरकार ने दिलेला शब्द पूर्ण केला. मतदारसंघात दिवसा वीज पुरवठा होणार असल्याने शेतकऱ्याचा जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागणार असल्याने राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडवणीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार राज्य सरकारचे आभार व्यक्त करतो.

### शेतकऱ्यांना दिलासा

शेतकऱ्याला रात्री अप रात्री पाणी देण्यासाठी येणाऱ्या अडचणी व नैसर्गिक अपघात टाळले जाणारा असून ८ सबस्टेशनला ५ एम.व्ही ए. चे अतिरिक्त नवीन ट्रान्सफर मंजूर होऊन ते मतदारसंघात दाखल झाले असून या सबस्टेशनला उच्च दाबाने पुरवठा पारगाव जोगेश्वरी,शिराळ,टाकळी अमिया,वाहिरा, पिंपळा तसेच शिरूर तालुक्यातील मानूर टाकळी,तिंतरवणी या सब स्टेशनला अतिरिक्त ५ एम. व्ही.ए. चे तर ब्रम्हनाथ येळंब या सबस्टेशनला १० एम. व्ही.ए. चे ट्रांसफार्मर दाखल झाले असून मतदारसंघातील शेतकऱ्याला मोठा दिलासा मिळाला असल्याने आ.सुरेश धस यांनी राज्य सरकारचे आभार मानले आहेत.

# जिल्ह्यातील खासगी क्लासेस बंद करा

### उमाकिरण प्रकरणाने जिल्हा बदनाम, १ जुलै रोजी धरणे आंदोलन
### मनसेच्या वर्षा जगदाळे यांचे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन !

बीड । प्रतिनिधी

खाजगी क्लासेसच्या नावाखाली शहरात सुरू असलेले घाणेरडे प्रकार संताप जनक असून जिल्हाभरात खाजगी क्लासेस मोठ्या प्रमाणात चालत आहेत. या क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांना शिकवण देणारे शिक्षक यांचे चरित्र प्रमाणपत्र तपासणे आवश्यक झाले असून शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुल मधील घडलेल्या प्रकारामुळे पालक वर्गात संताप व्यक्त करण्यात येत असून जिल्हाभरात सुरू असलेले खाजगी क्लासेस बंद करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य महिला उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी केली आहे.

गुरु शिष्याच्या नात्याला काळीमा फासणाऱ्याउमा किरण येथील खाजगी क्लासेसचे शिक्षकांना तात्काळ अटक करत



कडक कारवाई करण्याची मागणी वर्षाताई जगदाळे यांनी केली असून, खाजगी क्लासेस मध्ये शिकवणी घेणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या प्रा. विजय पवार व प्रशांत खटावकर हे दोन्ही आरोपी गुन्हा दाखल झाल्यानंतर फरार झाले आहेत. या प्रकरणामुळे खाजगी क्लासेस मधील मुलींची सुरक्षितेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पालक आपल्या मुलांचे भविष्य घडवण्यासाठी खाजगी शिकवणी मध्ये विद्यार्थ्यांना मोठी फिस भरून दाखला घेतात. या ठिकाणी विद्यार्थ्यांना शिकवणी देणारे शिक्षक यांची गुणवत्ता व चरित्र तपासणी होणे आवश्यक बनले आहे. बीड जिल्ह्यात मागील काही वर्षात महिला व मुलीवर अत्याचारात वाढ झाली आहे. शिक्षण क्षेत्रातील या घटनेमुळे बीड जिल्ह्याची मान शर्माने पुन्हा खाली गेली आहे. विशेष म्हणजे यातील आरोपी हा सामाजिक व राजकीय प्रतिष्ठित असून त्यांच्याकडून असे गैरकृत्य होणे समाजाला अपेक्षित नाही. परंतु अशा हीन मानसिकतेच्या नराधमालासमाजातराहण्याचा कोणताही अधिकार नाही . अशा विकृत लोकांमुळे समाजातचुकीचा संदेश जातो. हजारो विद्यार्थी एका ठिकाणाहून भविष्य घडवण्यासाठी स्वप्न पाहत आहेत त्याच ठिकाणी असे घाणेरडे प्रकार होत असतील तर पालकांनी काय करावे असा प्रश्न उपस्थित होत असून या दोन्ही आरोपींना पोलिसांनी तात्काळ अटक व खाजगी क्लासेस पूर्णपणे बंद करण्याच्या मागणीसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर १ जुलै २०२५ रोजी धरणे आंदोलन करणार असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य महिला उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी निवेदनात म्हटले आहे.

# सर्वसामान्य नागरिकांना सुविधा पुरविण्यासाठी नगर परिषदेने तत्पर रहावे -अमरसिंह पंडित

गेवराई । प्रतिनिधी

नगरपरिषदे सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी काम करत असते नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत तसेच व्यापारी वर्गाला देखील सुविधा मिळाल्या पाहिजेत हाच हेतू ठेवून नगरपरिषद काम करत असते. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कसलेही राजकारण न करता सर्वसामान्यांच्या आणि व्यापारी वर्गाच्या सेवेसाठी तत्पर राहावे असे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. गेवराई नगर परिषदेच्या वतीने विविध विकासकामांचा शुभारंभ करताना ते बोलत होते.

गेवराई शहरामध्ये नगर परिषदेच्या वतीने रुपये १ कोटी ५० लक्ष रुपये किंमतीच्या व्यापारी संकुल बांधकामाचा तसेच नविन बसस्थानक ते चार्वाक हॉटेल पर्यंत सिमेंट कॉंक्रिट नाली बांधकामाचा शुभारंभ जयभवानी कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते आणि




मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आला. यावेळी भवानी बँकेचे चअरमन बप्पासाहेब मोटे, माजी नगराध्यक्ष विनोद सौंदरमल, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजाभाई, माजी नगरसेवक जालिंदर पिसाळ, राधेशाम येवले, कृष्णा मुळे, मंजुर बागवान, विलास सुतार, आवेज शरीफ, सय्यद नजीब, उत्तमराव सोलाने, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपक आतकरे, संजय पुरणपोळे, बंटी सौंदरमल, धमपाल भोले, ॲड. योगेश पाटील, ॲड. गौतम कांडेकर, ॲड. मनोज हजारे, दत्ता दाभाडे, संतोष आंधळे, मानवी हक्क अभियानचे कडुदास कांबळे, मोहसिन बागवान, सुभान शेख, सुभाष गुंजाळ, विलास ठाकुर, दत्ता लाड, संतोष सुतार, वसीम फारोकी, जे.के. बाबुभाई, अक्षय पवार, संदिप मडके, रजनी सुतार, बाबा शेख, राजाभाऊ जवंजाळ, कमलाकर हातागळे, दादासाहेब चौधरी, खालेद कुरेशी, सतिष दाभाडे, विलास निकम, सुनिल सुतार, शाम सुतार, नविद मशायक, सादेक शेख, बाळराजे सोनकांबळे, अन्सारी आदींसह राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. पूढे बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, गेवराई शहराचे अर्थकारण मजबुत करण्यासाठी शहराला जोडणारे रस्ते झाले पाहिजेत. गेवराई शहराच्या प्रत्येक भागाचा विकास झाला पाहिजे असेही ते यावेळी म्हणाले.

# जिल्हा तिथं डिजिटल मिडिया परिषद उभारणार-वाघमारे

मुंबई । प्रतिनिधी

**अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार डिजिटल मिडिया परिषदेत आपण महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्यांना राज्य कार्यकारिणी मध्ये प्रतिनिधित्व देणार असल्याचे मत डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी व्यक्त केले.**

याबाबत पुढे बोलताना ते म्हणाले की अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण राज्यभरात परिषदेचे जाळे निर्माण झाले आहे.

### २ जुलै रोजी मुंबईत पुरस्कार वितरण सोहळा

महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या जिल्हा पत्रकार संघाच्या टिम सर्व क्षेत्रात कार्यरत आहेत. आम्ही सुद्धा डिजिटल मिडिया परिषद महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात निर्माण व्हावी म्हणून प्रयत्न करत आलो आहोत. राज्यातील ऐंशी टक्के जिल्ह्यात डिजिटल मिडिया परिषद ही मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांच्या नेतृत्वाखाली व विश्वस्त किरण नाईक सर,विश्वस्त शरद पाबळे सर,अध्यक्ष मिलिंद



अष्टीवकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली युद्ध पातळीवर काम करत आहे. येत्या २ जुलै रोजी मुंबई मध्ये अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पुरस्कार वितरण सोहळा पार पडत आहे. या सोहळ्याला राज्यभरातील पत्रकार बांधव उपस्थित राहणार असुन सध्या या सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात येत आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा हा महत्वपूर्ण कार्यक्रम असुन या सोहळ्याला तत्कालीन केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार सह आदी मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या सोहळ्यात सहभागी होणे आवश्यक आहे.या कार्यक्रमाच्या माध्यमातूनच आपला स्नेह वृद्धिंगत होण्यासाठी या भेटीत आपण महत्वपूर्ण विषयांवर चर्चा देखील करणार आहोत. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख सर यांच्या आदेशानुसार व विश्वस्त किरण नाईक सर,विश्वस्त शरद पाबळे सर,अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर सर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर सर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे सर, कोषाध्यक्ष शेख मन्सुरभाई सर यांच्या मार्गदर्शनाखाली आपण डिजिटल मिडिया परिषदेची राज्य कार्यकारिणी बळकट करण्यासाठी लवकरच काही राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यासाठी वरिष्ठांचे आदेश व मार्गदर्शन घेणार असल्याचे मत डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी व्यक्त केले.

## पान ६ वरून...

### तंत्रशिक्षण मंडळाच्या

(७६ टक्के), विशाल शितोळे (७५ टक्के), गौरी फुण्णे (७१.२९ टक्के), अभिषेक मुसळे (७१.२९ टक्के), द्वितीय वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग शाखेतून योगिता निळे (८०.८२ टक्के), पांडूरंग पवार (७५.७७ टक्के), वैष्णवी नागरगोजे (७२.९४ टक्के), तृतिय वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग शाखेतून मुक्ता बिडगर (८९.८९ टक्के), ओम भगत (८९.७८ टक्के), आकांक्षा मुंगळे (८९.२८ टक्के), प्रथम वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरींग शाखेतून ओंकार रेणवकर (७८.५६ टक्के), रितेश घोरपडे (७५ टक्के), अभय खरटमोल (७४.२२ टक्के), द्वितीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरींग शाखेतून ज्ञानेश्वरी सिरसाठ (८१.७८ टक्के), आदित्य चव्हाण (७७.७८ टक्के), सिद्धार्थ गवळी (७३.३३ टक्के), तृतिय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरींग शाखेतून मेघराज साठे (८३.३३ टक्के), संकेत डोंगरे (७६.४४ टक्के), वेदांत तट (७५ टक्के) या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अदीनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनिल मिटकरी, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी. कार्यवाहक प्राचार्य डॉ.एन.ए.रावबावले, तंत्रनिकेतनचे प्राचार्य लक्ष्मीकांत बगले, विभागप्रमुख व्हि.व्हि.कन्नुर, श्रीमती अंजली कुलकर्णी, कु.रेणुका डबीर, प्रा.व्हि.व्हि.रावबावले, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

### तहसील कार्यालयाने

धारकांची यादी विशिष्ट नमुन्यामध्ये पाठवण्यासाठी पत्रव्यवहार केला परंतु पंचायत समिती विभागाकडून कुठलाही पाठपुरावा होत नव्हता यासाठी स्मरण पत्र ही गटविकास अधिकारी यांना देण्यात आले तरीदेखील यादी उपलब्ध झाली नाही. घरकुल मंजूर झालेली यादी ९ जून च्या अगोदर गौण खनिज या संकेतस्थळावर महसूल विभागाच्या वतीने अपलोड करण्याची संधी होती. गौण खनिज अधिनियमानुसार जून जुलै ऑगस्ट सप्टेंबर या महिन्यांमध्ये नदीपात्रामधून उत्खनन करण्यास मनाई असते. त्यामुळे ९ जून हे अंतिम तारीख घरकुलधारकांच्या वाळूसाठी देण्यात आली होती. पंचायत समिती विभागाने मंजूर धारकाचे याद्या न दिल्याने महसूल विभागाला याद्या या संकेतस्थळावर दाखल करता आल्या नाही. त्यासाठी तहसील कार्यालय जबाबदार नाही.

गेवराई तालूक्यात्तील घरकूल बांधकामासाठी वाळू मिळणे बाबतचे लाभार्थी यांची यादी देण्यात येणारे विवरणपत्रात एक्सेलशीट मध्ये गावनिहाय, पीडीएफ करून माहीती तात्काळ सादर करणे बाबत वारंवार पंचायत समिती विभागाला पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. याबाबतचे स्मरण पत्र ही देण्यात आले असून पंचायत समिती विभागाने घरकुल लाभार्थ्याची यादी न दिल्याने घरकुलधारक वाळू मिळण्यापासून वंचित राहिले आहे.

### रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई

सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. या प्रसंगी रोटरीचे सचिव धनराज सोळंकी यांनी, शालेय शिस्त, गुणवत्ता, सर्व उपक्रमात विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग पाहून कुंबेफळच्या जिल्हा परिषद शाळेचे कौतुक केले. तर यावेळी गावचे सरपंच लिंगेश्वर तोडकर यांनी संगणकासाठी यूपीएस देणार असल्याचे जाहीर केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती अंबुरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार श्री.जिरगे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी शाळेतील सहशिक्षक संतोष गायकवाड, डी.एम.कसबे, एम.एम.गायकवाड, श्रीमती एम.एम.तोडकर, श्रीमती एम.व्ही.मुंडे, श्रीमती एम.पी.सरवदे, श्रीमती पी.यु.जाधव, श्रीमती एन.आर.जाधव, गाताडे सर, एम.एन.गायकवाड यांनी पुढाकार घेतला.

# मुस्लिम समाजाविरोधात सतत वक्तव्य करून हिंदू समाजाला मुस्लिम द्वेषासाठी प्रवृत्त करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करा

पाटोदा । प्रतिनिधी

अल्पसंख्यांक मुस्लिम समाजा विरोधात सतत वक्तव्ये करून हिंदू समाजाला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या मुस्लिम द्वोषा साठी प्रवृत्त करून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचे सतत कट रचून देशात अस्थैर्य निर्माण करण्याचा प्रयत्न करणारा विरोधात गुन्हा दाखल करून कडक कारवाई करणे मागणी सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र शाखा पाटोदाच्या वतीने दि. २७ जुन २०२५ रोजी तहसीलदार यांच्या मार्फत राज्याचे राज्यपाल सी. पी. कृष्णन यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की मागील बऱ्याच काळापासून उल्लेखीत काही राजकारणी लोक अज्ञात लोकांसोबत मिळून कट रचल्या प्रमाणे सतत मुस्लिम अल्पसंख्यांक समाजा विषयी द्वोष निर्माण होईल व त्याद्वारे हिंदू



## सकल मुस्लिम युवक पाटोदा यांची राज्यपालांकडे मागणी

समाजातील लोक मुस्लिमांविषयी चुकीची धारणा बाळगून त्यांच्या विरोधात हिंसा आणि लिंचिंग तसेच बहिष्कार करण्यास आपोआप बाध्य होतील अशा प्रकारची वक्तव्ये करीत आहेत.मा. सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकारची वक्तव्ये करणाऱ्या लोकाविरोधात सरकारने स्वतः हुन गुन्हे दाखल करुन कडक कारवाई करण्याचा आदेश दिलेला आहे.

असे असतांना काही व्यक्ती सतत मुस्लिमांना निशाणा करून द्वोषवर्धक वक्तव्ये व भाषण करुन, व त्याची माहिती पद्धतशीर पणे सोशल मीडिया आणि इतर माध्यमातून पसरवून दोन समाजात तेड, व अल्पसंख्यांक मुस्लिम समाजात दहशत निर्माण करत आहेत. नितेश राणे ,संग्राम जगताप , महेश लांडगे , गोपीचंद पडळकर , मेधा कुलकर्णी व इतर या सर्व लोकांविरुद्ध मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशा अन्वये तात्काळ गुन्हे दाखल करुन त्यांनी कोणासोबत मिळून कट रचला आहे किंवा कसे याचा सखोल तपास करावा, तसेच त्यांना सामील असणाऱ्या सर्व कटातील सहभागी सूत्रधारांविरुद्ध जरब बसेल अशी कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे. या निवेदनावर सकल मुस्लिम युवक पाटोदा समन्वयक,आदींच्या स्वाक्षरी आहेत.

# स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय ग्रामीण रुग्णालयातील रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी जपत स्टेट बँक ऑफ इंडिया च्या ७० व्या वर्धापन दिनानिमित्त अंबाजोगाई येथे रक्तदान शिबीराचे आज आयोजन करण्यात आले. यावेळी ३५ जणांनी रक्तदान केले आहे.

स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) च्या वर्धापन दिनानिमित अंबाजोगाई शहरातील प्रशांत नगर येथील एसबीआय बँकेच्या शाखेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. अंबाजोगाई शहरातील आणि आशिया खंडातील



सर्वात मोठं असलेल्या सस्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात होत असलेला रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी जपत शाखा व्यवस्थापक सुयश कुमार व बैंक कर्मचाऱ्यांच्या पुढाकारातुन आयोजित रक्तदान शिबीरात तब्बल ३५ जणांनी रक्तदान केले. या कार्यक्रमाचे उद्घाटन यमपली शागिरी (चिफ मॅनेजर आर ए सी सी)व राजेश गुप्ता (मैनेजर) यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात शाखेचे अधिकारी सुयश कुमार (शाखा व्यवस्थापक), विकास नाळे (मॅनेजर) विनय सोनवणे, अक्षय कुलकर्णी, विश्वजित हातागळे यांनी सहभाग घेतला.यावेळी तालुक्यातील ग्राहक, शेतकरी, नागरिक, कर्मचारी उपस्थित होते. या बँकेच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. आयोजित रक्तदान शिबिरात प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

cmyk

cmyk

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार

रविवार दि.२९ जून २०२४


# खरीप पेरण्यांच्या तोंडावर राज्यात युरिया अन् डीएपी खतांचा तुटवडा

## पेरण्यांपूर्वीच शेतकऱ्यांची दमछाक

महाराष्ट्रात खरीप पेरण्यांना आता सुरुवात झाली आहे. अनेक भागात झालेल्या विस्तीर्ण पावसामुळे शेतकऱ्यांची लगबग वाढली आहे. मात्र खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच राज्यात युरिया आणि डीएपी (डायमोनियम फॉस्फेट) या अत्यावश्यक खतांची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. ( ) या टंचाईमुळे पेरणीसाठी तयार असलेले लाखो शेतकरी चिंतेत आहेत.राज्यातील विविध भागधारकांनी बुधवारी ही बाब स्पष्ट करत सरकारकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये हंगाम सुरू होण्यापूर्वी, जिल्हा कृषी विकास अधिकाऱ्यांकडून संबंधित विक्री अंतर्गत खतांची साठवणूक आणि संरक्षण केले जाते. राज्य सरकार मार्केटिंग फेडरेशनला वाहतूक, गोदामाचे भाडे, कर्जावरील व्याजासाठी निधीही देते. मात्र पेरण्यांच्या तोंडावर खतांचा तुटवडा असल्याने राज्यभरातील शेतकऱ्यांची चिंता वाढलीय.

खरीप हंगामात युरिया अन्? डीएपी खतांचा तुटवडा

पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार,राज्यात खरीप हंगामासाठी एकूण १५.५२ लाख मेट्रिक टन युरिया आणि ४.६० लाख मेट्रिक टन डीएपी खत लागते.



मात्र आतापर्यंत फक्त ५.२० लाख मेट्रिक टन युरिया आणि १.२६ लाख मेट्रिक टन डीएपीच मिळाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना वेळेत आणि योग्य दरात खत मिळत नाही, आणि काळाबाजार वाढत असल्याचीही तक्रार शेतकरी करत आहेत. दुसरीकडे, कॉम्प्लेक्स खतांचा साठा मात्र राज्यात भरपूर आहे. गरजेपेक्षा ११३ टक्के अधिक साठा उपलब्ध आहे. त्यामुळे या खतांचा योग्य वापर करून ही टंचाई थोडीशी तरी भरून काढता येऊ शकते, असं विक्रेत्यांचं म्हणणं आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी खते बियाणे कीटकनाशके विक्रेते संघटनेचे माजी अध्यक्ष जगन्नाथ काळे यांनी सांगितलं, ''राज्याला आवश्यक तो साठा वेळेत मिळाला पाहिजे. राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड या केंद्र सरकारच्या कंपनीचं मुख्यालय मुंबईत आहे. पूर्वी या कंपनीचं ७० टक्के उत्पादन महाराष्ट्रासाठी राखून ठेवण्यात यायचं. पण सध्या हे खत राजस्थानला दिलं जातंय, आणि तिथल्या खासगी कंपन्या महाराष्ट्राला खत पुरवत आहेत. ही व्यवस्था अन्यायकारक आहे आणि सरकारने यात लक्ष घालणं गरजेचं आहे.''

सोयाबीनचं बोगस बियाणं, ८ दिवस झाले तरी बियाणे उगवेना

नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकाचे बोगस बियाणे असल्याच्या तक्रारी कृषी अधिकाऱ्याकडे केल्या आहेत. त्यावरुन आता चौकशी सुरू झाली आहे. मध्य प्रदेशातील हे बियाणं असून, कमी पैशात हे बियाणं बाजारात विक्रीसाठी शेतकऱ्यांना उपलब्ध होते. त्यामुळं चांगलीच गर्दी केली होती. त्यानंतर शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करुन त्याची पेरणी केली परंतू, ८ दिवस झाले तरी बियाणे उगवत नसल्याने थडी सावरगाव येथील शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी लेखी तक्रार दिली होती. त्यावरुन ही आता चौकशी सुरू झाली आहे.

# शेतकऱ्यांनो डीएपी खतास 'ही' पर्यायी खते वापरा !

खरीप हंगामात काही ठराविक खताची कमतरता नेहमी आढळते. राज्यामध्ये खरीप पेरणीला सुरुवात झाली असून शेतकरी वेगवेगळ्या खताची खरेदी करत आहे. विशेषतः डीएपी खताची शेतकऱ्यांकडून जास्त मागणी आहे. डीएपी खता मध्ये १८ टक्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत.

डीएपी खताची कमतरता भरुन काढण्यासाठी पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरदयुक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-१६ टक्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामुळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डीएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डीएपी खतास चांगला पर्याय आहे. एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके - १०:२६:२६, एनपीके-२०:२०:०:१३, एनपीके-१२:३२:१६ व एनपीके-१५:१५:१५ या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुध्दा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो. त्याच बरोबर टीएसपी या खता मध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असून डीएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टीएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखील डीएपी खतास उत्तम पर्याय आहे. चालू खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांनी केवळ डीएपी खतावरच अवलंबून न राहता बाजार मध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून राज्यातील सर्व शेतकरी बांधवांना करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमीन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करण्यात इतर राज्यांच्या मानाने अग्रेसर आहे. जर शेतकर्यांनी उपलब्ध खताचे योग्य व्यवस्थापन केल्यास त्यांना खरीपात खत टंचाई सारख्या समस्येला सामोरा जावे लागणार नाही.



# जीवाणु संवर्धन प्रक्रियेचे फायदे आणि अनुप्रयोग



जीवाणु संवर्धन प्रक्रिया हे एक प्राकृतिक उपाय आहे ज्यामध्ये बियाण्यांच्या उगवणीत माध्यमाने जीवाणुंचे वापर करण्यात येते. हे प्रक्रिया जमिनीतून रोग प्रतिबंधात्मक क्रियाशीलता सुरू करते आणि बियाण्यांची उगवण क्षमता वाढते. त्याच्यात जीवाणू संवर्धकांचे वापर करण्यात येते, ज्यामुळे रोपांच्या सतेज व जोमदारपणे वाढते. या प्रक्रियेत वापरलेल्या बियाण्यांची उत्पादने वाढतात आणि कमी खर्चात रोग प्रतिबंधात्मक उपाय करून पेरणी करता येते. ह्या प्रक्रियेचा वापर करण्यामुळे जमिनीतुन सेंद्रीय पदार्थ कुजवून जमीन सुधारण्यास मदत होते.

बिजप्रक्रियेचे फायदे: १) जमिनीतुन व बियाणाद्वारे पसरणारया रोगांचा प्रादुर्भाव टाळता येतो. २) बियाण्याची उगवण क्षमता वाढते. ३) रोपे सतेज व जोमदारपणे वाढतात. ४) पिकाच्या उत्पादनात वाढ होते. ५) कमी खर्चात रोग प्रतिबंधात्मकउपाय करून पेरणी करता येते. जिवाणु संवर्धकाची बिजप्रकिया २५० ग्रॅम जीवाणु सवर्धकाचे पाकिट १० ते १५ किलो बियाण्यास वापरावे १ लिटर गरम पाण्यात १२५ ग्रॅम गुळ टाकुन द्रावण तयार करावे. द्रावण थंड झाल्यावर त्यामध्ये २५० ग्रॅम जीवाणु संवर्धन टाकुन बियाण्यास हळुवारपणे लावावे किंवा जीवाणु संवर्धकाचा लेप बियाण्यावर समप्रमाणात बसेल व बियाण्यांचा पृष्ठभाग (साल) खराब होणार नाही याची काळजी घ्यावी. बियाणे ओलसर करुन जीवाणू संवर्धन करणारे जिवाणू बियाण्यास चोळावेत नंतर बियाणे सावलीत स्वच्छ कागदावर सुकवावे. अशी बिजप्रक्रिया केलेल्या बियाण्यांची पेरणी ताबडतोब करावी त्यामुळे जमिनीतुन सेंद्रीय पदार्थ कुजवून जमीन सुधारण्यास मदत होते.

जीवाणू संवर्धन बिज प्रक्रियेबाबतची दक्षता : जीवाणू संवर्धन प्रक्रिया ही बुरशीनाशके किंवा कीटकनाशकांची प्रकिया केल्यानंतर करण्यात यावी. जीवाणु सवर्धके लावण्यापुर्वी जर बियाण्यास किटकनाशकाचे, बुरशीनाशके, जंतुनाशकाचे इ. लावलेले असतील तर जीवाणु संवर्धन नेहमीपेक्षा दीडपट जास्त प्रमाणात लावावे. रायझोबियम जीवाणु संवर्धनाची प्रक्रिया पाकीटावर नमुद केलेल्या विशिष्ट पिकाच्या गट समुहास करावी(एकदल, द्विदल, व व्यापारी पिके). ट्रायकोडर्मा जैविक बुरशिनाशक सोबत रायझोबियम अझोटोबॅक्टर, स्फुरद विरघळणारे जीवाणु या जीवाणु संवर्धकाची बिजप्रक्रिया करता येते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६१३ : इंग्लंड देशातील महान नाटककार शेक्सपिअर यांच्या लंडन स्थित ग्लोब नावाच्या थियेटरला आग लागल्याने जमीनदोस्त झाले.
१७५७ : बंगालचे नवाब मीर जाफर यांनी बंगाल, बिहार आणि ओडिसा प्रांताचे राज्य सांभाळले.
१८७१ : ब्रिटिश पार्लमेंटने कामगार संघटनांना परवानगी देणारा कायदा केला. यापूर्वी कामगार संघटना स्थापन करणार्यांना व अशा संघटनांच्या सदस्यांना ब्रिटनमधून तडीपार करुन ऑस्ट्रेलियात पाठवले जात असे.
१९७४ : इसाबेल पेरेन यांनी अर्जेंटिनाच्या पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून शपथ घेतली.
१९७५ : स्टीव्ह वोजनियाक यांनी ऍपल -१ संगणकाचे पहिले प्रोटोटाइप तपासले.
१९८० सेशेल्सला (इंग्लंडपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८६ : आर्जेन्टिना ने १९८६ चा फुटबॉल विश्वकप जिंकला.
१९९५ : दक्षिण कोरियातील सेऊल येथे 'सँपूंग डिपार्टमेंटल स्टोअर'ची इमारत कोसळून ५०२ जण ठार तर ९३७ जखमी झाले.
१९९६ : मेक्सिको देशांत आयोजित फुटबॉल विश्वचषक अर्जेंटिनाने जिंकला.
२००१ : ज्येष्ठ शास्त्रज्ञ कृष्ण दामोदर अभ्यंकर यांना एम. पी. बिर्ला पुरस्कार जाहीर
२००१ : पण्डित हृदयनाथ मंगेशकर यांना 'नटसम्राट बालगंधर्व पुरस्कार' जाहीर
२००७ : ऍपल ने आपला पहिला मोबाईल फोन, आयफोन प्रकाशित केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९३ : प्रोपेलर चे शोधक जोसेफ रोसेल यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑक्टोबर १८५७)
१८६४ : शिक्षणतज्ज्ञ व वकिल आशुतोष मुखर्जी यांचा जन्म.
१८७१ : श्रीपाद कृष्ण कोल्हटकर नाटककार, वाङ्मय समीक्षक व विनोदी लेखक (मृत्यू: १ जून १९३४)
१८९१ : डॉ. प. ल. वैद्य प्राच्यविद्यासंशोधक (मृत्यू: २५ फेब्रुवारी १९७८)
१८९३ : प्रसंत चंद्र महालनोबिस भारतीय संख्याशास्त्राचे जनक, 'इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्युट' चे संस्थापक (मृत्यू: २८ जून १९७२)
१९०१ : प्रसिद्ध भारतीय क्रांतिकारक तसचं, काकोरी व दक्षिणेश्वर बॉम्बहल्ला प्रकरणांचे सुत्रदार राजेंद्र लाहिरी यांचा जन्मदिन.
१९०८ : प्रतापसिंग गायकवाड बडोद्याचे महाराज (मृत्यू: १९ जुलै १९६८)
१९२२ : रोमानियन वंशीय सर्बियन कवी वास्को पोपा यांचा जन्मदिन.
१९३४ : कमलाकर सारंग रंगकर्मी, निर्माते, दिग्दर्शक व लेखक (मृत्यू: २५ सप्टेंबर १९९८)
१९४५ : चंद्रिका कुमारतुंगा श्रीलंकेच्या ५ व्या राष्ट्राध्यक्षा
१९४६ : पनामाचे राष्ट्राध्यक्ष अर्नेस्टोपेरेझ बॅलादारेस यांचा जन्म.
१९५६ : पोर्तुगालचे पंतप्रधान पेद्रोसंताना लोपेस यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन


१८७३ : बंगाली कवी मायकेल मधुसूदन दत्त यांचे निधन. (जन्म: २५ जानेवारी १८२४)
१८९५ : थॉमस हक्सले ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ, विज्ञानकथालेखक आणि डार्विनच्या उत्क्रांतिवादाचा खरा समर्थक (जन्म: ४ मे १८२५)
१९६१ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते आणि भारताचे पहिले संरक्षणमंत्री सरदार बलदेव सिंह यांचे निधन.
१९६६ : दामोदर धर्मानंद कोसंबी प्राच्यविद्या पंडित, गणितज्ञ, विचारवंत व इतिहासकार (जन्म: ३१ जुलै १९०७)
१९८१ : दिगंबर बाळकृष्ण तथा दि. बा. मोकाशी साहित्यिक (जन्म: २७ नोव्हेंबर १९१५)
१९९२ : अल्जेरियाचे राष्ट्राध्यक्ष मोहंमद बुदियाफ यांचे निधन.
१९९२ : शिवाजीराव भावे सर्वोदयी कार्यकर्ते (जन्म:)
१९९३ : विष्णुपंत जोग 'चिमणराव-गुंड्याभाऊ' मधील गुंड्याभाऊची भूमिका अमर करणारे गायक अभिनेते (जन्म:)
२००० : कॅप्टन वासुदेव श्रीपाद बेलवलकर ऐतिहासिक कादंबरीकार (जन्म: १८ फेब्रुवारी १९११)
२००३ : कॅथरिन हेपबर्न हॉलिवूड अभिनेत्री (जन्म: १२ मे १९०७)
२०१० : प्रा. शिवाजीराव भोसले विचारवंत, वक्ते व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: १५ जुलै १९२७)
२०१६ : प्लास्टिक कलेसाठी प्रसिद्ध भारतीय पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण पुरस्कार तसचं, कालिदास सन्मान प्राप्त कलाकार के.जी. सुब्रमण्यम यांचे निधन.

# पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी बांबू लागवडीस प्राधान्य द्यावे

पुणे : जागतिक तापमानवाढीमुळे हवामान बदलाचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी बांबू लागवडीस प्राधान्य द्यावे आणि मोठ्या प्रमाणावर बांबूची लागवड करावी, असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे यांनी केले. मनरेगा अंतर्गत बांबू व फळबाग लागवड कार्यक्रम राबविण्यासाठी विधान भवन येथे पुणे विभागातील विविध विभागांचे अधिकारी आणि स्वयंसेवी संस्थाच्या पदाधिकारी यांच्यासाठी आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, मनरेगा महासंचालक नंदकुमार, मनरेगा आयुक्त अजय गुल्हाणे, जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, कुमार आशिर्वाद, राजा दयानिधी, जितेंद्र डूडी, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, रोजगार हमी योजना उपायुक्त वैशाली इंदाणी ऊंटवाल, विभागीय कृषी सहसंचालक रफीक नाईकवाडी, बी.जी.बिराजदार आदी उपस्थित होते.

श्री.दराडे म्हणाले की, बांबू ही दीर्घकालीन आणि सदाहरित वनस्पती असून लागवडीचा खर्च कमी असल्याने शेतकऱ्यांना फायदेशीर आहे. सध्या मागणीच्या तुलनेत बांबूचा पुरवठा कमी आहे. पर्यावरणपूरक विविध आकर्षक वस्तू आणि फर्निचर निर्मितीसाठी बांबूची वाढती मागणी लक्षात घेता दरवर्षी सुमारे एक लाख बांबू लागवड करण्याचे नियोजन आहे. बांबूची लागवड, त्यावरील प्रक्रिया आणि विक्री सुलभतेने होण्यासाठी तालुकास्तरावर बांबू डेपो स्थापन करण्यात येणार आहेत. त्यासाठी समन्वय अधिकारी नेमण्यात येणार आहे. बांबू लागवडीसाठी शासनाच्यावतीने प्रतीहेक्टर सात लाख रुपये अनुदान देण्यात येत असल्याची माहिती श्री.दराडे यांनी दिली. कार्यशाळेत सहभागी झालेल्या अधिकाऱ्यांनी चंद्रपूर येथील बांबू प्रशिक्षण केंद्र आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यात बांबूपासून निर्मिती केलेल्या वस्तू, पर्यटन केंद्राच्या ठिकाणची निवासव्यवस्था आणि तेथील बांबूचा वापर पाहण्यासाठी आवर्जून भेट द्यावी अशी सूचनाही त्यांनी केली.

विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार म्हणाले, विभागातील उघडे बोडके डोंगर तसेच गायरान आणि मोकळ्या जागेवर मोठ्या प्रमाणावर बांबूची लागवड करावी आणि पुढील पाच वर्षे त्याची निगराणी करावी. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गाळ साचण्याचे प्रमाण कमी होण्यासाठी आणि जमीनीची धूप टाळण्यासाठी मिशन मोडवर बांबू लागवड करण्याची तसेच त्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी, सिंचन विभाग आणि वन विभाग अधिकारी यांच्या समन्वयाने बांबू लागवड आणि संवर्धनाचे काम करावे असे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना दीर्घ काळापर्यंत बांबूचे निश्चित उत्पादन घेता येईल आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल असे मनरेगा महासंचालक श्री.नंदकुमार यांनी सांगितले. भारतात बांबू उत्पादन आणि त्यावरील प्रक्रिया उद्योगास मोठी संधी असून शाश्वत भविष्यासाठी बांबू उत्पादनात वाढ करण्याची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले. बांबू उत्पादन आणि प्रक्रिया, फर्निचर निर्मिती, घरांची निर्मिती आणि उत्पादन वाढीसाठी नियोजित योजना तसेच बांबूचा वापर करुन बांधण्यात आलेले बंगळूरू येथील विमानतळ, सिंधुदूर्ग व चंद्रपूर येथील बांबू निर्मित वस्तू यासंबधी सादरीकरणाद्वारे त्यांनी माहिती दिली. कार्यशाळेत विभागातील वन विभाग, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.



cmyk

# यशस्वी होण्यासाठी जे जे गुण हवेत ते गुण म्हणजे खरी गुणवत्ता - सुशील कुलकर्णी

## संस्था वर्धापन दिन व गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा ७४ वा वर्धापन दिनानिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याप्रसंगी सुशील कुलकर्णी बोलत होते.यावेळी त्यांनी सांगितले की,विद्यार्थ्यांनी गुणपत्रिकेतील गुणांचा विचार न करता जीवनात यशस्वी होण्यासाठी जे जे गुण,कौशल्य आवश्यक आहेत ते गुण व कौशल्य आत्मसात करणे म्हणजे खरी गुणवत्ता आहे. शिक्षणात अपयश मिळाले म्हणून खचून न जाता जिद्द आणि आत्मविश्वास यांच्या बळावर आपल्या आवडत्या क्षेत्रात आपण सर्वोच्च शिखरावर पोहचू शकतो याचे अनेक दाखले यावेळी त्यांनी दिले. सकाळी ठिक साडे आठ वाजता सुशील कुलकर्णी यांच्या हस्ते संस्थेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर शहरातील मॉ वैष्णवी मंगल कार्यालयात गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.यावेळी सीबीएसई, प्राथमिक, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ ज्योतीताई ठाकुर (उपाध्यक्षा-भा.शि. प्र.संस्था, अंबाजोगाई), तसेच नवभारत एज्युकेशन पुरस्कार प्राप्त प्रा.चंद्रकांत मुळे (मुख्य




प्रशासकीय समन्वयक-भा.शि. प्र.संस्था, अंबाजोगाई), तसेच व्यासपीठावर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे,श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी,कार्यवाह अड विश्वास जोशी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना प्रा.चंद्रकांत मुळे यांनी सांगितले की,भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ही गुणवत्तेची खाण आहे ८०० पेक्षा अधिक विद्यार्थी ९०% पेक्षा अधिक गुण घेणारे आहेत. मला मिळालेल्या पुरस्काराचे सर्व श्रेय भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे आहे असे त्यांनी सांगितले व सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन भावी शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना अमरनाथ खुर्पे यांनी सांगितले की, केल्याने होत आहे रे आधी केलेचि पाहिजे या बोधवाक्याच्या प्रेरणेतून या संस्थेची वाटचाल सुरू झाली.या संस्थेच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर झाले आहे. गुणवत्ता,संस्कार आणि भौतिक दृष्टीने सर्वात मोठे संकुल श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुल आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप सौ ज्योतीताई ठाकुर यांनी केले. प्रास्ताविक तथा संस्था परिचय अड. विश्वास जोशी यांनी केले.आभार माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप यांनी केले तर सुत्रसंचलन श्रीमती अपर्णा मुळे,परिचय श्रीमती स्वप्ना देशपांडे,तर बक्षीस वाचन दहावी प्रमुख नरेंद्र कोष्टगावकर,प्रा राजाराम जाधव यांनी केले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम्? ने झाली.यावेळी महाविद्यालय समितीचे अध्यक्ष अभय कोकड, प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष पवन मानधने,शिशु विहारचे अध्यक्ष लक्ष्मीकांत जोशी, सीबीएसईचे अध्यक्ष तेजस महाजन,सर्व स्थानिक संस्था सभासद,प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुमती गिरी,शिशु विहारच्या श्रीमती वर्षा कुलकर्णी, सीबीएसईच्या श्रीमती वंदना मिटकरी,माता - पिता पालक, शिक्षक,प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# पाटोदा नगरीत संत भगवान बाबा यांच्या पालखी सोहळ्याचे स्वागत

पाटोदा । प्रतिनिधी

राष्ट्रसंत, ऐश्वर्यसंपन्न संत भगवान बाबा यांच्या पालखीचे पवित्र आगमन होताच संपूर्ण शहर भक्तिरसात न्हालं. ढोल-ताशांचा गजर, टाळ-मृदुंगांचा निनाद, आणि भक्तांच्या गजरांनी आसमंत दुमदुमून गेला. सर्वत्र श्रद्धा, आनंद आणि अध्यात्मिक उर्जा भरून राहिली होती.जसे की संतांचे स्वागत नव्हे, तर भक्तीचा महोत्सव!पाटोदा शहरात सकाळ पासूनच उत्सवाचे वातावरण होते. सकाळी १०.३० वाजता पालखीने नगरात प्रवेश केला.

हजारो भाविक रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून 'जय संत भगवान बाबा' च्या घोषणांनी स्वागत करत होते. शहरातील गल्लीबोळ भगव्या पताकांनी, पुष्पसजावट आणि आकर्षक रांगोळ्यांनी सजले होते. महिलांनी औक्षण करून, फुलांची अर्घ्ये वाहून, पारंपरिक पोशाखात भक्ती भावाने स्वागत केले. तर युवकांनी ढोल-ताशांच्या लयीत नृत्य करत भक्तीचा उत्सव उभारला.आस्थेने साकारलेले नियोजन, सेवाभावी हातांची साथ सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी पाटोदा नगरपंचायत, पोलीस प्रशासन, वैद्यकीय सेवा, स्वयंसेवक आणि सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे अतुलनीय कार्य केले.

वाहतूक, स्वच्छता, पाणीपुरवठा, अन्नछत्र, महाप्रसाद आदी सर्व व्यवस्था उत्तम प्रकारे पार पाडण्यात आल्या. कोणतीही अडचण न येऊ देता संपूर्ण सोहळा अत्यंत शिस्तबद्धपणे पार पडला.पाटोदा नगरीचा सुवर्णक्षण संत भगवान बाबा यांच्या पालखीचे पाटोदा नगरीतील आगमन हा केवळ धार्मिक कार्यक्रम नव्हता, तर तो संपूर्ण शहरासाठी एक आध्यात्मिक महोत्सव होता. हा दिवस नगरीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला जाईल, अशी भावना अनेक भाविकांनी व्यक्त केली. संतांचे पावन चरण स्पर्शल्याने संपूर्ण पाटोदा अध्यात्मिक उर्जेने भारावले होते. पाटोदा नगरपंचायत च्या वतीने भव्य दिव्य असं स्वागत नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष सर्व नगरसेवकांच्या वतीने करण्यात आले.

## थोडक्यात

### विद्यार्थिनीचा लैंगिक छळ : आरोपींना तात्काळ फाशी द्या: स्वाती कातखडे

पाटोदा । प्रतिनिधी

बीड शहरातील उमाकिरण नावाच्या खाजगी क्लासमध्ये शिकणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थिनीच्या सातत्याने लैंगिक छळ झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून, पालकवर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.या गंभीर प्रकरणी सावता सेनेच्या बीड जिल्हा अध्यक्षा सौ. स्वातीताई कातखडे यांनी तीव्र संताप व्यक्त करत तत्काळ आरोपींना अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी जोरदार मागणी केली आहे.स्वातीताईंनी म्हटले की, ''अशा विकृत प्रवृत्तीमुळे निष्पाप मुलींचे बालपण उद्ध्वस्त होत आहे. त्यामुळे अशा घटनांना आळा बसावा यासाठी कठोर कारवाई आणि त्वरित न्याय आवश्यक आहे.''तसेच, भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व खाजगी क्लासेसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक करण्यात यावे, अशीही मागणी सावता सेनेच्या महिला बीड जिल्हाध्यक्षा स्वातीताई कातखडे यांनी केली आहे.

### मूकबधिर शाळा नेकनूर येथे डॉक्टर हेलन केलर यांची जयंती साजरी



२७ जून वार शुक्रवार रोजी नेकनूर येथील मूकबधिर शाळेत डॉक्टर हेलन केलर यांची जयंती साजरी करण्यात आली.त्यांना पाहता येत नव्हतं, ऐकू येत नव्हते, आणि बोलताही येत नव्हते. स्वतः दिव्यांग असून त्यांनी दिव्यांगावर मात करून एका डोळस माणसाला लाजवेल इतकं यश त्यांनी मिळवलं. वयाच्या २२ व्या वर्षी त्यांनी स्वतःची आत्मकथा''द स्टोरी ऑफ माय लाईफ '' अँन सली वन यांच्या साह्याने लिहिले. त्यांनी कर्णबधिर लोकांच्या स्थितीबद्दल प्रेरणादायी भाषणे देऊन २५ देशांचा प्रवास सुद्धा केला. १९६४ साली राष्ट्रपती लींडन बी जॉन सीन यांच्या हस्ते हेलन केलर यांना अमेरिकेतील सर्वश्रेष्ठ नागरिक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. आज डॉक्टर हेलन केलर जगात नसल्या तरी हेलन केलर आणि सलीव्हन यांच्यातल्या गुरु शिष्याच्या पलीकडचे नाते त्यांचे चरित्र समाजप्रतीचे कार्य आपल्याला प्रत्येकाला चिरंतर स्फूर्तीदायक ठरणारे आहे. अशाप्रकारे डॉक्टर हेलन केलर यांचा कार्याचा आढावा आपल्या मनोगत मधून श्री गिराम सर आणि श्री राखुंडे सर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्रीमती खराटे मॅडम यांनी केली सूत्रसंचालन श्रीमती खरंगुळे मॅडम यांनी केले आणि कुलकर्णी सर यांनी कार्यक्रमाचे आभार मानले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थिती डॉक्टर हेलन केलर यांची जयंती मोठ्या थाटात साजरी करण्यात आली.

# गावठी दारुची चोरटी विक्री करणाऱ्या महिलेविरुध्द पोलीसांची कारवाई

माजलगाव । प्रतिनिधी

येथील शहर पोलीसांना गोपनिय माहीतीच्या आधारे शहरातील जुना बाजार रोड भागात दि २७ जुन शुक्रवार रोजी सायंकाळी ७:३० वाजता छापा मारुन तेथे अवैधरित्या गावठी हातभट्टीची दारु चोरटी विक्री करणारी महीला नामे सत्यभामा सुरेश मेंडके रा. सय्यदगल्ली माजलगांव हीचे ताब्यातुन गावठी हातभट्टीची तयार ३० लिटर दारु तसेच गावठी दारु तयार करण्यासाठी उपयोगात येणारे २०० लिटर रसायण,तसेच दारु व रसायण ठेवण्यासाठी वापरात असलेले प्लास्टीकचे व लोखंडी ड्रम असा एकुण ३७,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन नमुद महलेविरुध्द गु.र.नं. २३७/२९२५ कलम ६५ (ई),(फ) महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.सदरची कारवाई नवनीत कॉवत,पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके,अप्पर



पोलीस अधीक्षक अंबाजोगाई,निरव राजगुरु, उपविभागीय पोलीस अधिकारी, गेवराई अति. पदभार उपविभाग माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक संदिप राठोड,पोहेकॉ किशोर जाधव, पोलीस अंमलदार शिवगणेश मिरकले, महीला पोलीस अंमलदार स्नेहल परदेशी यांनी केली आहे.

# समिधा फाऊंडेशन व सरहद संस्थेचा उपक्रम

## दिंद्रुडच्या विद्यार्थ्यांना पुस्तक हेच शस्त्र उपक्रमा अंतर्गत पुस्तक भेट

दिंद्रुड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात वाचन संस्कृती रुजवण्याचा हेतूने समिधा फाउंडेशन व सरहद पुणे या संस्थांच्या वतीने दिंद्रुड च्या विद्यार्थ्यांना पुस्तक हेच शस्त्र उपक्रमांतर्गत पुस्तक भेट देण्याचा कार्यक्रम शनिवारी पार पडला. दीडशे पुस्तकांचा वाटप याप्रसंगी करण्यात आले.

मुलांच्या मनामध्ये चांगले विचार यावेत, जिज्ञासा आणि आत्मभान निर्माण व्हावे, गुन्हेगारी प्रवृत्ती नाहिशी होण्यासाठी कायद्याचे ज्ञान मिळावे या उद्देशाने पुणे येथील समिधा फाउंडेशन व सरहद पुणे या संस्थेच्या वतीने राज्यभरात विविध प्रकारच्या पुस्तकांचे वाटप करण्यात येते याच अनुसंगाने माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील स्व. सोनाजीराव रांजवन माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. संस्थेचे समन्वयक देवराज युवराज ठोंबरे यांनी या उपक्रमाच्या आयोजन केले होते. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य जी व्ही उजगरे जेष्ठ शिक्षक बारवकर एस. एस, वायबसे डी .बी, क्रिडा विभागप्रमुख भुसारे एम. टी क्रिडा शिक्षक



तथा पत्रकार कटारे डी .व्ही,सांस्कृतिक विभाग प्रमुख के.बी भोसले,चव्हाण व्ही आर, माजी उपसरपंच युवराज ठोंबरे, ग्रा पं सदस्य अतुल चव्हाण, आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सपाटे, पत्रकार गणेश काटकर, विद्यालयचे सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेत्तर उपस्थित होते. गेल्या काही काळात बीड जिल्ह्यात वाढत चाललेली गुन्हेगारी आणि तरुणांमध्ये वाढणारी हिंसक प्रवृत्ती लक्षात घेता पुस्तक हेच शस्त्र या विचाराने प्रेरित होऊन हा उपक्रम हाती घेण्यात आला. वाचनाने निर्माण झालेला विचारांचा प्रभाव यशस्वी जीवनासाठी अमुलाग्रह बदल करतो. म्हणून आम्ही पुस्तक वाटपाचा उपक्रम राबवत आहोत.

-देवराज ठोंबरे,समन्वयक समिधा

# अवैधरित्या गुटखा बाळगुन चोरटी विक्री करणाऱ्यावर माजलगांव शहर पोलीसांचा छापा

## ५४ हाजारांचा मुद्देमाल जप्त; दोघाजणां विरोधात गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

येथील शहर पोलीसांना गोपनिय माहीतीच्या आधारे शहरातील जुना मोंढा भागातील न्यु तुळजाभवानी ट्रेडर्स किराणा दुकान दुकानावर दि २७ जुन शुक्रवार रोजी रात्री ०८:२० वाजता छापा मारुन नमुद दुकानातुन महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला राजनिवास, जाफरानी जर्दा, डायरेक्टर, आरएमडी,हिरा पानमसाला,गोवा असा वेगवेगळ्या कंपनीचा ३९६१६/- रुपये किमतीचा गुटखा व एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल असा एकुण ५४६१६/-रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन सदर गुटखा स्वतःच्या ताब्यात बाळगुन चोरटी विक्री करणारा संजय शिवाजीराव होके वय ३४ वर्षे रा. पाटील गल्ली माजलगांव तसेच इतर एका विरुध्द गु.र.नं.२३८/२०२५ कलम १२३,२७४,२७५,३ (५) भारतीय न्याय संहीता प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.सदरची कारवाई नवनित कॉवत,पोलीस



अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके,अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई,नीरव राजगुरु, उपविभागीय पोलीस अधिकारी, गेवराई अति. पदभार उपविभाग माजलगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, सहा.पोलीस निरीक्षक प्रल्हाद मुंडे,पोलीस अंमलदार अंगद घोडके,महादेव बहीरवाळ यांनी केली आहे.

# जय भवानी महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापनावर कार्यशाळा संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व भारत गॅस एजन्सी पाटोदा जामखेड यांच्या संयुक्त विद्यमाने घरगुती गॅस व्यवस्थापन या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य घाडगे एस व्ही पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक बापू घोक्षे शेख सर भारत गॅस एजन्सीच्या प्रमुख गरजे मॅडम व त्यांचे सहकारी कर्मचारी शारदा माने संकेत गरजे संतोष देवडे अमय गरजे सुरेश तांबे उपस्थित होते.

सर्वप्रथम या कार्यक्रमाची प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉक्टर लोखंडे यांनी केली आपत्ती व्यवस्थापन या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले आपत्ती या दोन प्रकारचे असतात नैसर्गिक आपत्ती आणि मानवनिर्मित आपत्ती आपत्ती विषयक माहिती




दिली यानंतर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे सौ गर्जे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना घरगुती गॅस बाबत माहिती देऊन आपत्ती कशी टाळता येईल याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य सोमनाथ घाडगे सर यांनी विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे धडे घेऊन मानवी हानी टाळली पाहिजे असे मनोगत व्यक्त केले प्राध्यापक शेख सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी स्वयंसेवक विद्यार्थी महाविद्यालयातील कर्मचारी यांनी सहकार्य केले या कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक शिवाजी भोरे यांनी मानले

# महाराणी ताराबाई विद्यालयाचे प्राचार्य राऊत यांचा सेवापूर्ती निरोप समारंभ

## प्राचार्य राऊत सरांचे हजारो विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात सरकारी पदावर कार्यरत- माजी आ.आंधळे

वडवणी। प्रतिनिधी

वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य डी.डी.राऊत सर यांचा सेवापुर्ती निमित्त निरोप समारंभ सोहळा रेणुका माता मंदिर देवस्थान,वडवणी या ठिकाणी महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने संपन्न. वडवणी येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य डी.डी.राऊत सर यांनी ३४ वर्ष प्रदीर्घ ज्ञानदानाच पवित्र कार्य करून नियत वयोमानानुसार संस्थेच्या प्रदीर्घ सेवेतून दि.३१ मे २०२५ रोजी ते सेवानिवृत्त झाले आहेत त्यांचा महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत सेवापूर्तीच्या निमित्त सपत्नीक सत्कार व निरोप समारंभ सोहळ्याचा कार्यक्रम गुरुवार दि.२६ जून २०२५ रोजी रेणुका माता मंदिर देवस्थान वडवणी या ठिकाणी आयोजित करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक,सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तर प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी मा. नानाभाऊ हजारे तसेच वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती तथा संस्कार शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.अनिलदादा चोले,उपनगराध्यक्ष मा.बन्सीभाऊ मुंडे, संस्थेचे माजी अध्यक्ष राजेभाऊ वारे, भाजपा वडवणी तालुका अध्यक्ष सुखदेव बप्पा रेडे, ह.भ.प.आचार्य विठ्ठल महाराज शास्त्री, ह.भ.प.दुटाळ महाराज,शिवसेना तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे,माजी सभापती प्रशांत बापू सावंत,सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रकाश पाटील सर, सतीश बप्पा बडे, अनिल भाऊ वाघमारे, सतीश वाघमारे, ॲड.ज्ञानेश्वर लंगे, ॲड. विनायक जाधव,विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजयभाऊ आंधळे,संचालक पांडुरंगजी अंडील,संचालक रणजीत भैय्या धस,युवा मोर्चा तालुकाध्यक्ष ईश्वरजी तांबडे, डॉ.खोटे, शाळेच्या संस्थेचे संचालक इंजि.अशोक आंधळे,विद्यालयाच्या नुतन प्राचार्या शोभाताई आंधळे- डोईफोडे मॅडम,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर आदींजन जण मान्यवर म्हणून उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन व छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु.प्रिती तुरुगझाडे हिने आपले विचार व्यक्त केले तसेच श्री. डोईफोडे सर,श्री.पाटील सर,संपादक अनिलजी वाघमारे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की,''मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा''असे जिवलग मित्र प्राचार्य राऊत सर सेवानिवृत्त झाले आहेत ते आता डोंगरचा राजा साप्ताहिकाचे उपसंपादक काम करतील असे बोलून सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा दिल्या तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे सेवापूर्ती सत्कार सोहळ्यात बोलताना म्हणाले की,राऊत सर म्हणजे एक प्रमाणिक,सच्चा व कामाचा माणूस त्यांनी घड्याळाच्या काट्याकडे पाहुन कधिच काम केले नाही,जादा वेळ दिला तेव्हाच शाळेला व संस्थेला चांगले दिवस पाहवयास मीळाले. त्यानंतर सत्कारमूर्ती श्री.राऊत सर व सौ.राऊत मॅडम यांचा हार,शाल व सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. सत्कारमूर्ती प्राचार्य राऊत सर यांनी सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले की,माझी ओळख ही मी स्वतः निर्माण केलेली नसुन ही मा.आ.केशवराव दादा आंधळे यांनी पाठीवर टाकलेल्या शाब्बासकिचाच परीणाम,महाराणी ताराबाई शाळेचा एक शिक्षक हीच माझी ओळख. त्यानंतर अध्यक्षीय समारोपपर विचार माजी आमदार केशवदादा आंधळे साहेब व्यक्त करताना म्हणाले की,राऊत सरांचे या महाराणी ताराबाई संकुलावर फार उपकार आहेत हे विसरुन चालनार नाही,त्यांनी या पूढेही त्यांनी आपली शाळा समजुन सहकार्य करावे असे बोलून सेवापूर्तीच्या शुभेच्छा दिल्या. पत्रकार जगदीश गोरे,पत्रकार ज्ञानेश्वर वाव्हळ,पत्रकार अविनाश मुजमुले,पत्रकार शंकर झाडे, पत्रकार अर्जुन मुंडे,पत्रकार सोनवणे,पत्रकार विष्णू डोईफोडे या कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपप्राचार्य मस्के सर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.अंडील जी.पी.सर व सौ.प्रियंका कुरकुटे मॅडम यांनी केले आणि उपस्थितांचे आभार पर्यवेक्षक धाईतिडक सर यांनी मानले. या कार्यक्रमाची सांगता साने गुरुजी यांच्या खरा तो एकची धर्म या प्रार्थनेने झाली. त्यानंतर रुचकर भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यालयातील विद्यार्थी शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पत्रकार जगदीश गोरे,पत्रकार ज्ञानेश्वर वाव्हळ,पत्रकार अविनाश मुजमुले,पत्रकार शंकर झाडे, पत्रकार अर्जुन मुंडे,पत्रकार सोनवणे,पत्रकार विष्णू डोईफोडे यांच्यासह पालक,राजकीय,सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबाजोगाई न.प.वर शहर विकास संघर्ष समितीचा मोर्चा धडकला

## नागरी सुविधा व इतर गंभीर समस्यांकडे निवेदनातून लक्ष वेधले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**नागरी सुविधा, घरकुले, भोगवटा मालमत्ता मालकी हक्कांत घेणे व इतर गंभीर समस्यांची सोडवणूक करा यासह एकूण सहा मागण्यांचे निवेदन मुख्याधिकारी यांना देत शहर विकास संघर्ष समितीचा मोर्चा शुक्रवारी अंबाजोगाई नगरपरीषदेवर धडकला.**





शहर विकास संघर्ष समितीच्या वतीने नागरी सुविधा, घरकुले, भोगवटा मालमत्ता मालकी हक्कांत घेणे व इतर गंभीर समस्यांची सोडवणूक करा यासह एकूण सहा मागण्यांचे निवेदन मुख्याधिकारी यांना शुक्रवार, दिनांक २७ जुन रोजी देण्यात आले. सदरील निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, या शहरात निवारा व भोगवटा मालकी हक्क या बाबत अनेक वर्षांपासून जनता आंदोलन करीत आहे, हे प्रश्न अद्याप ही कायमचे सुटलेले नाहीत, नगरपरिषदची कौन्सिल नसल्याच्या कालखंडात मुख्याधिकारी यांच्या नियंत्रणात शहरात अनेक कामे जनतेच्या पैशाचा अपहार करणारी झालेली आहेत, त्याची चौकशी करणे आवश्यक आहे, आम्ही खालील मुद्यांसाठी आज आंदोलन करीत आहोत, मागण्या अशा १) सर्व झोपडपट्टी विभागात घरकुलांचा लाभ द्या, २) भोगवट्याची घरे मालकी हक्कांत घ्या, ३) शहरात न.प.ची जुनी दुकाने व्यक्तीगत मालकी हक्कांप्रमाणे नाममात्र भाड्याने दिलेली आहेत, त्या सर्व दुकानांचा लिलाव करा, दर पाच वर्षांनी व्यापारी संकुलातील दुकाने लिलावात काढा, ४) शहरातील पाणी पुरवठा सर्वांत वाईट आहे, तो नियमीत करा, ५) पावसाळ्यात स्वच्छता मोहीम कायम राबवा आणि ६) आपल्या काळात व्यापारी हेतूसाठी झालेली अतिक्रमणे ताबडतोब निष्कासीत करा या मागण्यांवर आपण येत्या आठ दिवसांत तात्काळ अंमल केला नाही. तर परत तीव्र आंदोलन केले जाईल याची नोंद घ्यावी. असा इशारा शहर विकास संघर्ष समितीने दिला आहे. मुख्याधिकारी मागण्यांचे निवेदन स्वीकारले. तर नगरपरिषदेच्या मिटींग हॉलमध्ये मुख्याधिकारी प्रियांका टोंगे व नगरपालिका अधिकारी यांच्यासोबत झालेल्या चर्चेत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ.बब्रुवाहन पोटभरे, भिमशक्ती संघटनेचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख, हमीद चौधरी, यशोधन लोमटे, लोकजनशक्ती पार्टी (रा) युवाचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे शहराध्यक्ष असेफोद्दीन खतीब, अभिजीत लोमटे, ऍड.इस्माईल गवळी, विनोद शिंदे, बाबा शेख, प्रेम माने, मनिष आदमाने, संतोष पारधे, विशाल पोटभरे, लोकजनशक्ती पार्टी (रा) युवाचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक काळे, केज तालुकाध्यक्ष गंगाधर पौळ, प्रदीप गुंडरे, दिनेश घार, अझहर शेख अकबर शेख, आदित्य चौरे, करण तेलंग, सुजित मुसळे, कैलास मस्के, सागर मिरगुडे, शुभम तरकसे, सुमित आवाडे, संकेत तरकसे, अविनाश मोरे, रोहन आवडे, धीरज आवाडे, शुभम भोसले, राम मोरे, सागर किर्दंत, चिकू जोगदंड यांच्यासह विविध पक्ष आणि संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सहभाग घेतला.

# खामगाव येथे विद्यार्थ्यांनी केले फळबाग लागवडीसाठी खड्डे खणण्याचे प्रात्यक्षिक, शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर

बीड । प्रतिनिधी

सौ.के.एस.के.(काकू) कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वतीने खामगाव येथे शेतकऱ्यांसाठी खड्डे खणणे व खड्डे भरणे प्रात्यक्षिक नुकतेच आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमात शेतकऱ्यांना फळबाग लागवड, वृक्षारोपण, तसेच पावसाळ्यापूर्व तयारीसाठी खड्डे कसे खणावेत याचे मार्गदर्शन करण्यात आले.



कार्यक्रमात कृषिदुतांनी शेतकऱ्यांना खड्डे खणताना प्रत्येक फळपिका नुसार आणि लागवडीच्या पद्धतीने नुसार खड्ड्याचा आकार बदलतो. जास्त लागवडीचे अंतर असलेल्या फळ पिकांकरिता १११ मी. चा खड्डा खाणून भरला जातो तर कमी अंतर असलेल्या फळ पिकांसाठी ६०६०६० सेमी. प्रमाणात खड्डा खणला जातो. हे शेतकऱ्यांना समजून सांगितले. शास्त्रीय पद्धतीनुसार खड्डे भरताना सेंद्रिय खते शेणखत, कंपोस्ट यासोबतच गांडूळ खत, करंज पेंड, कोणतेही एक कीडनाशक आणि स्फुरदयुक्त खताचा (एस. एस. पी.) यांचा वापर कसा करावा याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

शेतकरी बांधवांनी उस्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रमात सहभाग घेतला. त्यांनी अनेक शंका उपस्थित केल्या व कृषिदुतांनी त्याचे निवारण केले.

अशा प्रकारच्या प्रात्यक्षिकांमुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अनुभव व योग्य मार्गदर्शन मिळते, असे मत अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमत यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कृषीदुतांना महाविद्यालयाचे सहसचिव डॉक्टर जी. व्ही. साळुंखे सर, प्राचार्य डॉक्टर. एस. पी. मोरे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. टी. शिंदे व उपक्रमाचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक एस . व्ही. राठोड यांचे मार्गदर्शन लाभले व फलोत्पादन विभागाचे प्रा. बी. बी.तांबोळकर सर व पी. बी. मांजरे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तसेच यावेळी कृषीदूत आकाश जाधव, रोहन जावळे,गजानन घेणेकर, अमोल राठोड, विश्वनाथ गायके सानप,गणेश सय्यद झहीर हे उपस्थित होते.

# मराठी पत्रकार परिषदेकडून वारकऱ्यांना पाणी बॉटल वाटप

## पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंड्यातील वारकऱ्यांची सेवा म्हणजे पांडुरंगाची सेवा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातून पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंड्या मोठ्या प्रमाणात असल्याने विविध सामाजिक संघटनेकडून राजकीय पक्षाकडून वारकऱ्यांचे दिंड्यांच स्वागत मोठ्या उत्साहात केले जाते. यामध्ये पत्रकारांनी ही सहभाग नोंदवत वारकऱ्यांसाठी पाणी बॉटल वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली आहे.



शनिवारी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या दिंडीचा आगमन पाटोदा शहरामध्ये झालं दिंडीतील सर्व वारकऱ्यांसाठी मराठी पत्रकार परिषदेकडून पाणी बॉटल वाटप करण्यात आले. प्रत्येक वारकऱ्यांची सेवा ही पांडुरंगाची सेवा समजून मराठी पत्रकार परिषदेच्या सर्व पत्रकार बांधवांनी आपली सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबवला आहे. विविध उपक्रमातून नेहमीच सक्रिय असणारी मराठी पत्रकार परिषद आणि सर्व सदस्य हे सामाजिक भान ठेवून उपक्रम घेतात आणि त्यांचे कौतुकही सर्व क्षेत्रातून होत आहे. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे तालुकाध्यक्ष अजय जोशी, कार्याध्यक्ष सोमनाथ खंडागळे, उपाध्यक्ष अनिल गायकवाड यांच्यासह मराठी पत्रकार परिषदेचे सदस्य सक्रिय सहभाग नोंदवत या दिंडीतील वारकऱ्यांसाठी पाणी वाटपाचं काम करत होते.

वारकऱ्यांची सेवा म्हणजे पांडुरंगाची सेवा

पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी आषाढीनिमित्त जाणाऱ्या दिंड्या मोठ्या प्रमाणात पाटोदा शहरातून जातात त्यांचा स्वागत सर्वच राजकीय सामाजिक क्षेत्रातील बांधव मोठ्या प्रमाणात करतात आम्हीही पत्रकार बांधवांनी यावर्षी पाणी वाटपाचे कार्यक्रम हाती घेतला होता यामध्ये सर्व पत्रकारांनी सहभाग नोंदवत सर्व वारकऱ्यांची सेवा म्हणजे पांडुरंगाची सेवा हेच समजून कार्य केले आहे.

अजय जोशी अध्यक्ष मराठी पत्रकार परिषद पाटोदा.वारकऱ्यांची सेवा करायला मिळणं हे अहोभाग्य-प्रा.एस खंडागळे

आषाढी वारीनिमित्त पंढरपूर कडे जाणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करायला भेटणं हे अहोभाग्य च आहे.मराठी पत्रकार परिषद पाटोदा च्या वतीने जिल्हा उपाध्यक्ष सचिन पवार सर यांच्या मार्गदर्शनाखाली, ता.अध्यक्ष अजयजी जोशी यांच्या समवेत पाटोदा शाखा आपली सामाजिक बांधीलकी अन आध्यत्मिक वारसा जपत असल्याचा सार्थ अभिमान आहे.

# जिल्हा विकासाची दिशा; खा.सोनवणे घेणार आढावा

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात विविध योजनांतर्गत विकास कामे सुरू असून त्यांचा आढावा घेण्यासाठी दि.३० जून रोजी दुपारी ३ वाजता खा.बजरंग सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली दिशा समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात आयोजित केली आहे. या बैठकीत खा.बजरंग सोनवणे हे विविध विकास कामांना दिशा देण्याचे काम करणार आहेत.



जिल्हा विकास समन्वय समिती व सनियंत्रण समिती (दिशा) ची बैठक आयोजीत केलेली आहे. मागील बैठकीत खा.सोनवणे यांनी विविध विकास कामांचा आढावा घेताना विकास कामांना गती देण्याच्या सुचना दिल्या होत्या. यानंतर आता दि.३० रोजी दिशा समितीची बैठक आयोजित केली असून मागील आठ दिवसांपासून जिल्हा प्रशासनातील अधिकारी या बैठकीची तयारी करत आहेत. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे हे ग्राम पातळीपासून सर्व अनुभव असलेले नेतृत्व असून त्यांचा जिल्हा परिषदेतील योजनांचा दांडगा अनुभव आहे. यामुळे जिल्हा परिषदेतील अधिकारी तो अनुभव पाहता आपल्याकडून काही उणीव राहणार नाही, याची काळजी घेत आहेत. शिवाय आठ दिवसांपासून सर्व माहिती एकत्रित केली जात आहे. दि.३० रोजी दुपारी ३ वाजता या बैठकीला सुरूवात होणार आहे. या बैठकीत सन २०२४-२५ अखेरचा आढावा घेणार आहेत. तर त्याआधी दुपारी १२.३० वाजता जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची, राष्ट्रीय महामार्ग विभागाची तसेच रेल्वे कामांचीही बैठक आयोजीत केली आहे. या बैठकीला अनेक विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.



# बेलखंडी पाटोदा विद्यालयाच्या वतीने वारकऱ्यांना छत्र्या, रेनकोट वाटप

नवगण राजुरी । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाचा पायी दिंडी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान झाला. दिंडीतील वारकऱ्यांना बेलखंडी पाटोदा विद्यालयाच्या वतीने रेनकोट आणि छत्र्या वाटप करण्यात आल्या.

गुरूवार दि.२६ रोजी बेलखंडी पाटोदा येथे श्री क्षेत्र नारायण गडाच्या पायी दिंडी सोहळ्याचे आगमन होताच प्राचार्य धनवंत मस्के यांनी दिंडी सोहळ्याचे पुष्पहार अर्पण करून यथोचित असे स्वागत केले तसेच येणाऱ्या भाविक भक्तांना पावसाळी वातावरणामध्ये त्रास होऊ नये, म्हणून छत्र्या आणि रेनकोट वाटप करून दिंडीतील सर्व वारकऱ्यांना चहा पाण्याची व्यवस्था करण्यात आली. यावेळी शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व परिसरातील ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# तहसील कार्यालयाने अनेक वेळा पाठपुरावा केला -तहसीलदार खोमणे

## पंचायत समितीच्या कारभारामुळे घरकुलधारकांना वाळू मिळत नाही

गेवराई (प्रतिनिधी)

महाराष्ट्र शासनाच्या वतीने घरकुलधारकांना मोफत वाळू मिळणार अशी योजना काढण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी होण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने पंचायत समितीच्या विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत. परंतु पंचायत समितीच्या विभागाकडून वेळेत माहिती देण्यात आली नाही. अशी माहिती गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे यांनी दिली आहे.



या योजनेमध्ये घरकुलधारकांना वाळू मिळण्यासाठी तालुक्यातील मंजूर घरकुलधारकाचे नाव विहित नमुन्यामध्ये महसूल विभाग यांना दिल्यानंतर संबंधित महसूल विभागाच्या वतीने ती यादी गौण खनिज यांच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येते. त्यानंतर संबंधित घरकुलधारकाच्या नावे ईटीपी पावती तयार होऊन वाळू देण्यात येते.

जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने वाळू कोठून उपलब्ध करून द्यावी याच्या आदेश येतात त्यानुसार तहसीलदार काम करतात. गेवराई तालुक्यातील घरकुलधारकांना या नियमानुसार काम झाले असते. आठ दिवसांमध्ये वाळू मिळाले असते परंतु महसूल प्रशासनाने वारंवार पंचायत समिती यांना मंजूर घरकुल ◀◀ पान ३ वर

# रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीकडून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंबेफळच्या विद्यार्थ्यांना संगणक भेट

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीकडून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कुंबेफळच्या विद्यार्थ्यांना संगणक भेट म्हणून देण्यात आला.**




मावळतीच्या सूर्याकडून हाच घ्यावा अर्थ, पुन्हा नव्याने उगवता येते. जर मनगटात असेल सामर्थ्य. या उक्तीप्रमाणे आपला एक वर्षाचा कार्यकाल संपण्यासाठी अवघे दोन दिवस राहिलेले असताना रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीचे अध्यक्ष व सचिव यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंबेफळच्या विद्यार्थ्यांना संगणकीय ज्ञान मिळविण्यासाठी शुक्रवार, दिनांक २७ जुन रोजी संगणक भेट म्हणून दिले. हा (संगणक प्रणालीचे मॉडेल आणि कॉन्फिगरेशन - डेल ऑप्टीप्लेक्स ३०४०, आय ३, ८ जीबी रॅम, २५६ जीबी एसएसडी वायफाय) व डिस्ट्रिक्ट ग्रर्न्ड ३१३२ मधून १०० शाळेला १०० संगणक देण्यात आले. यात रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीने जिल्हा परिषद शाळेचे कुंबेफळची निवड केली. रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक अशा विविध क्षेत्रांमध्ये काम करते. कुंबेफळ शाळेच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता, शिकण्याची जिद्द व शिक्षकांची शाळा व विद्यार्थ्यांप्रती असलेली तळमळ पाहून रोटरी क्लबने शाळेस संगणक देऊन शैक्षणिक मदत केली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका हजारे व प्रमुख पाहुणे म्हणून अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती विलासराव सोनवणे, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, कुंबेफळ गावचे सरपंच लिंगेश्वर तोडकर, माझी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व्यंकट किर्दन्त, ग्रामपंचायत सदस्य ओम यादव, हनुमंत कदम तसेच कुंबेफळ शाळेतील ◀◀ पान ३ वर

# तंत्रशिक्षण मंडळाच्या उन्हाळी परीक्षेत टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकचे यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था संचलीत टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकच्या, विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने घेतलेल्या उन्हाळी परीक्षा-२०२५ मध्ये उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवत दैदीप्यमान यश संपादन केले. त्यामध्ये गणित विषयात अंकिता हाके, योगेश्वरी जाधव आणि शुभ्रा हालगे या विद्यार्थीनींनी १०० पैकी १०० गुण घेऊन स्पृहणीय यश संपादन केले आहे. कॉम्प्युटर इंजीनीअरींग शाखेचा निकाल ९८ टक्के, इलेक्ट्रिकल इंजीनीअरींग शाखेचा निकाल ९५ टक्के, मेकॅनिकल इंजिनिअरींग शाखेचा निकाल ९० टक्के,




सिव्हिल इंजिनिअरींग शाखेचा निकाल ८० टक्के, ईलेक्ट्रॉनिक्स कॉम्प्युटर इंजि.शाखेचा निकाल ९५ टक्के लागला आहे.

प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनीअरींग शाखेतून अंकिता हाके (९४.१२ टक्के), योगेश्वरी गाढवे (९३.१८ टक्के), शुभ्रा हालगे (९२ टक्के), द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनीअरींग शाखेतून समाधान छत्रे (९०.२४ टक्के), क्षितीजा आगळे (८९.७७ टक्के), वैभवी रांदड (८७.०६ टक्के), तृतिय वर्ष कॉम्प्युटर इंजिनीअरींग शाखेतून अभिषेक सुरवसे (९३.५४ टक्के), स्नेहल पवार (९१.७७ टक्के), बालाजी गायकवाड (९१.०६ टक्के), प्रथम वर्ष ईलेक्ट्रॉनिक्स कॉम्प्युटर इंजिनिअरींग शाखेतून गायत्री मुंडे (८५.६३ टक्के), अंजली धायतिडक (८२.२५ टक्के), अस्मिता गित्ते (७८.१३ टक्के), प्रथम वर्ष स्थापत्य इंजिनिअरींग शाखेतून आदित्य दराडे (७७.४४ टक्के), सुमित चटप (७३.८९ टक्के), आशिष पवार (६९.४४ टक्के), प्रथम वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग शाखेतून आदित्य औताडे ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ज्ञानोबा..तुकाराम..ज्ञानोबा..तुकाराम जयघोषाने बेलवाडी दुमदुमली...!
## संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील पहिले गोल रिंगण उत्साहात संपन्न

इंदापूर । प्रतिनिधी

संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील लाखो वारकरी, क्षेत्र देहू येथून हरिनाम गात मजल दर मजल करत क्षेत्र पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनाला जाताना पालखी सोहळ्यातील पहिले मानाचे गोल रिंगण बेलवाडी (ता. इंदापूर) येथे भक्ती रसात नाहून जय घोष करीत वाटचाल करतात. हीच प्रथा यंदाही पालखी सोहळ्याने जपत मानाचे दोन अश्व गोल रिंगणात सोडून या अश्वांच्या तीन परिक्रमेने वारकऱ्यांनी अनेक सांप्रदायिक खेळ खेळत पहिले गोल रिंगण उत्साहात पार पडले.

धन्य मी मानिण आपुले संचित ।
राहिलीसे प्रीत तुझे नामी ।
धन्य जालो आता यासी संदेह नाही
न पडे या वाही काळा हाती ।
ब्रम्हरस करू भोजन पंगती ।
संताचे संगती सर्वकाळ ।

विठ्ठल नामाचा महिमा गात निघालेल्या संत तुकाराम महाराज पालखी सोहळयांतील पहिले गोंल रींगण टाळकरी, विणेकरी, पताकावाले, पखवांजे व तुळशिवाल्या महिला व मानाचे अश्व यांनी सुरू असलेल्या हरीनामाचा गजरात परीक्रमा पुर्ण करीत. गोल रींगण सोहळ्यात लाखो नयनांचे पारणे फेडले. ज्ञानोबा.तुकाराम..ज्ञानोबा..तुकाराम या हरी गजराने बेलवाडी दुमदुमली.



संत तुकाराम महाराज पालखी सोहळयांचे सालाबाद प्रमाणे,यंदाही सणसर गावच्या हददीतील मुक्काम आटपून सकाळ च्या प्रहरात बेलवाडी कडे पालखी सोहळा मार्गस्थ झाला. या पालखी सोहळयांत बेलवाडी गावात पहिले गोंल रींगण असल्याने इंदापूर, बारामती, दौंड या तालुक्यातील मोठ्या संख्येने रिंगण सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी नागरिक उपस्थित होते.

क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते अश्वांचे पूजन

तुकोबारायांचा पालखी रथ रिंगण स्थळी सकाळी ७.४० मिनिटांनी दाखल झाला. गावकऱ्यांनी पालखी रथातून खांद्यावर घेत रिंगण स्थळावरील शामियानात जयघोष करीत आणली. यावेळी राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे तसेच पालखी विश्वस्तांच्या हस्ते रिंगण सोहळ्यात मानांच्या आश्वांचे पूजन पार पडले. सर्व विभागाचे शासकीय अधिकारी व गावकरी उपस्थित होते. वार्यांच्या वेगाने विणेकरी झेंडेकरी, टाळकरी धावले व मानाचे अश्व पुजन क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांचे हस्ते करून रिंगणात सोडण्यात आले.

माऊलीमाऊली असा आवाज आसमंतात पोहचत होता. काहि निमिश्यांचा विलंब न लावता रिंगणातील अश्वांनी परीक्रमा पुर्ण केल्या. फुगडयां पावल्या रंगल्या होत्या. अश्वांच्या दौडीनंतर रींगण सोहळ्यांची सांगता करण्यांत आली.

पांडुरंगा काहि आईकावी मात!
न करावे मुक्त आता मज !
जन्मांतरे मज तैशी देई देवा !
जेणे चरण सेवा घडे तुझी !

तोफांची सलामी

बेलवाडीकर नेहमी वारकर्यांची सेवा करण्यासाठी आतुर झालेले असतात. त्याच पध्दतीने आजही आपल्या घरी वारकर्यांना भोजन व इतर सेवा देऊन वारकर्यांचा पाहुचांर न्हाहरी दिली. अशीच सेवा जन्मोजन्मी मिळू दे, असे साकडे गावकरी घालताना दिसत होते. दुपारच्या विश्वातीसाठी पालखी गावकर्यांनी गुलाब फुलांच्या पाकळ्यांचा वर्षाव करीत गावातील मारूत्ती मंदिरात आणली. तोफांची सलामी देत गावकर्यांनी स्वागत केले. दुपारची न्याहरी घेऊन पालखी सोहळा लासुर्ण जंक्शन अंथूर्ण मार्गी निमगाव केतकी कडे मार्गस्थ होणार आहे.

# मांडीला मांडी लावता आणि गद्दारी करता
## अजित पवारांनी पदाधिकाऱ्यांना सुनावले खडेबोल

बारामती । प्रतिनिधी

माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीनंतर आयोजित आभार मेळाव्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पक्षातील काही पदाधिकाऱ्यांनी गद्दारी केल्याचा गंभीर आरोप केला. मांडीला मांडी लावून बसता आणि गद्दारी करता, अशा शब्दांत त्यांनी कार्यकर्त्यांची कानउघडणी केली. भर सभेत कोणाचा पंचनामा करणार नाही, पण एकेकाला बोलावून फैलावर घेतो, असे म्हणत त्यांनी आपला राग व्यक्त केला.



निवडणुकीत अजित पवार 'ब' प्रवर्गातून उमेदवार होते आणि त्यांना ९१ मते मिळाली. त्यांनी सांगितले की, आपल्या विचारसरणीची ८६ मते हक्काची होती, परंतु विरोधकांनीही मतदान केल्याने त्यांना ९१ मते मिळाली. हक्काची ८६ मते मला मिळाली, तेवढीच मते आपल्या इतर उमेदवारांना मिळायला हवी होती, पण तसे झाले नाही. आपल्याच काही पदाधिकाऱ्यांनी गद्दारी केली, असे पवार यांनी स्पष्टपणे सांगितले.

त्यांनी पुढे नमूद केले की, मतमोजणीच्या वेळी काही उमेदवारच उपस्थित नव्हते, तर विरोधकांपैकी काहीजण आणि इतर मंडळी आपल्या संपर्कात होती आणि मदत करत होती. सर्वजण जीवाचे रान करून काम करत होते, पण आपलेच उमेदवार मतमोजणीला हजर नव्हते. असा हलगर्जीपणा चालणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

माळेगाव येथील या मेळाव्यात अजित पवार यांनी विजयासाठी सर्वांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले, परंतु चुका झालेल्या ठिकाणी बोट ठेवत कार्यकर्त्यांना खडसावले. बाहेरील विरोधकांपेक्षा आपल्याच काही गद्दारांपासून धोका आहे, असे ते म्हणाले.

# वाहतूक पोलिसांच्या कारवाईच्या निषेधार्थ अन्नधान्य वाहतूकदारांचा बेमुदत बंदचा इशारा

पुणे : वाहतूक पोलिसांकडून माल वाहतूक करणाऱ्या गाड्यांवर कारवाई करण्यात येत असल्याच्या निषेधार्थ अन्नधान्य, दूध, भाजीपाला, फुले, तसेच औषधांची वाहतूक करणाऱ्या गाड्या १ जुलैपासून बेमुदत बंद ठेवणार असल्याचा इशारा दि पूना डिस्टीक्ट मोटार गुडस् ट्रान्सपोर्ट असोसिएशनने दिला आहे.




शहराच्या मध्यभागात असलेल्या नाना पेठ, भवानीपेठ, गणेश पेठेतील भुसार बाजार, तसेच मार्केट यार्डातील भुसार बाजारात अन्नधान्य वाहतूक करणाऱ्या ट्रक, टेम्पोवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे. शहरातील विविध रस्त्यावर जड वाहनांवर वाहतूक पोलिसांनी बंदी घातली आहे.

जीवनावश्यक वस्तुंची वाहतूक करणाऱ्या गाड्यांवर वाहनांवर कारवाई केली जात असल्याने अन्नधान्य, दूध, भाजीपाला, फुले, तसेच औषधांची वाहतूक करणारी वाहने बेमुदत बंद ठेवण्यात येणार असल्याचा इशारा दि पूना डिस्टीक्ट मोटार गुडस् ट्रान्सपोर्ट असोसिएशनने दिला आहे.

याबाबत दि पूना डिस्ट्रिक्ट मोटार गुडस् ट्रान्सपोर्ट असोसिएशनची सभा नुकतीच झाली. याबाबत त्यांनी व्यापारी संघटनांना पत्र दिले आहे. शहरातील गंभीर अपघातांच्या पार्श्वभूमीवर प्रमुख रस्त्यांवर दिवसा जड वाहनांवर निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

निर्बंधामुळे पुणे शहरात जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे भाववाढ होऊन त्याची झळ सामन्यांना सोसावी लागणार आहे.जीवनावश्यक वस्तूंचा व्यवसाय करणारे व्यावसायीक, हमाल कामगार तसेच अन्य घटकांवर परिणाम होणार आहे.

जीवनावश्यक वस्तुंची वाहतूक करणाऱ्या गाड्यांना सूट देण्यात यावी. हा प्रश्न तातडीने मार्गी लावणे, तसेच वाहतूकदारांच्या मागण्यांसंदर्भात जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, कृषी उपन्न बाजार समितीतील अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी.

याप्रश्नी तोडगा काढण्यात यावा, अशी मागणी मार्केट यार्डातील भुसार बाजारातील व्यापाऱ्यांची शिखर संघटना असलेल्या दि पूना मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष रायकुमार नहार यांनी केली आहे.

# कर कोट्यवधींचा, सुविधांचे काय? शेवाळेवाडी ग्रामस्थांचा महापालिका आयुक्तांना थेट सवाल

मांजरी । प्रतिनिधी

शेवाळेवाडी आणि मांजरी बुद्रुक या नव्याने समाविष्ट गावांमधून पुणे महापालिका कोट्यवधी रुपये कररूपाने गोळा करते. मात्र या गावांना मूलभूत सुविधांसाठी पुरेसा निधी मिळत नसल्याची खंत राहुल शेवाळे यांनी व्यक्त केली. खासदार मेधा कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्यासोबत झालेल्या बैठकीत शेवाळे यांनी गावातील रखडलेल्या विकासकामांचा आणि समस्यांचा पाढा वाचला.



राहुल शेवाळे यांनी सांगितले की, शेवाळेवाडी आणि मांजरी बुद्रुक ग्रामपंचायतींमधून महापालिकेने ८० कोटी रुपये कररूपाने वसूल केले, परंतु गावाच्या विकासासाठी केवळ पाच ते दहा लाख रुपये निधी मिळतो. ग्रामपंचायत काळात यापेक्षा जास्त निधी मिळून विकासकामे होत होती, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. यावेळी माजी सरपंच प्रतिमा शेवाळे, माजी उपसरपंच राहुल शेवाळे, विजय कोद्रे, संजय कोद्रे, चंद्रकांत शेवाळे, बाळकृष्ण आप्पा शेवाळे आणि मंगेश शेवाळे उपस्थित होते.

पिण्याच्या पाण्यासाठी ३४ कोटी रुपये मंजूर झाले असून, याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले होते. त्यांनी आयुक्तांना तातडीने हा प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या होत्या. या कामाचे टेंडर त्वरित काढण्याची मागणी शेवाळे यांनी केली. तसेच, पुणे-सोलापूर महामार्गालगत ड्रेनेज वाहिन्या नसल्याने उद्भवणाऱ्या समस्यांकडे लक्ष वेधत तातडीने ड्रेनेज लाईन टाकण्याची मागणीही त्यांनी केली. खासदार मेधा कुलकर्णी यांनी शेवाळेवाडी आणि मांजरीतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, ड्रेनेज वाहिन्या, स्ट्रीट लाईट, आरोग्य सुविधा आणि शास्तीकर माफी यासारख्या समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याची सूचना केली. आयुक्त नवल किशोर राम यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरात लवकर या समस्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन दिले. तसेच, ते लवकरच या भागाला भेट देणार असल्याचे सांगितले. शेवाळेवाडी आणि मांजरी ग्रामपंचायत हद्दीतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, ड्रेनेज वाहिन्या, स्ट्रीट लाईट आणि आरोग्य सुविधांसह नव्या गावांचा शास्तीकर माफ करण्याची मागणी खासदार मेधा कुलकर्णी यांनी केली. या समस्यांवर तातडीने उपाययोजना करून विकासकामांना गती द्यावी, असे त्यांनी सुचवले.

# १७ वर्षीय मुलीच्या भवितव्याचा विचार करून दांपत्याने वाद मिटविले; १० दिवसात झाला घटस्फोट

पुणे - मुलीच्या भवितव्याचा विचार करत ८ वर्षांपासून सुरू असलेले वाद अभियांत्रिकी दांपत्याने मिटविले. परस्पर संमतीने दोघे वेगळे झाले आहेत. १८ वर्षाचा संसार १० दिवसात संपला आहे. कौटुंबिक न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश शाम रुक्मे यांनी हा निकाल दिला.

वाद झाल्यानंतर मुलगी पत्नीकडे होती. निकालानुसारही ती पत्नीकडेच राहणार आहे. त्याने तिच्या भवितव्यासाठी २५ लाख रुपये दिले. दोघातील वादा मिटला. दोघांतर्फे अॅड. राणी कांबळे-सोनावणे यांनी न्यायालयात बाजू मांडली. त्यांना अॅड. ज्ञानदा कदम यांनी सहकार्य केले.

माधव (वय ४९) आणि माधवी (वय ४४) (नावे बदलली आहेत) यांचा विवाह डिसेंबर २००७ मध्ये झाला. दोघेही अभियंता असून, नोकरी करतात. सुरूवातील सुरळीत संसार सुरू होता. एक मुलगीही झाली. त्यानंतर दोघात वैचारिक मतभेद होऊ लागले. मतभेद विकोपाला गेल्यानंतर एप्रिल २०१७ पासून दोघे विभक्त राहू लागले. तो तर मध्य प्रदेश येथील इंदौर येथे निघून गेला. मात्र, दोघात कुरबुर सुरू होती.

मात्र, अॅड.कांबळे-सोनावणे यांनी केलेल्या संमुपदेशनानंतर दोघे घटस्फोटास तयार झाले. घटस्फोटासाठी अर्ज केला. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय-निवाड्यानुसार परस्पर संमतीने घटस्फोटाचा दावा दाखल करण्यापूर्वी दोघे १८ वेगळे राहत असल्यास सहा महिन्याचा कालावधी वगळता येतो.या प्रकरणात दोघे सुमारे ८ वर्षे वेगळे राहत आहेत. त्यामुळे हा कालावधी वगळण्याची मागणी अर्जदार वकिलांनी केली. त्यानुसार न्यायालयाने हा निकाल दिला आहे.

दोघातील मतभेदाचा परिणाम मुलीच्या भवितव्य, मनावर होत आहे. त्यामुळे वाद मिटवावेत, असे दोघांना समुपदेशनात समजावले. दोघे घटस्फोट घेण्यास तयार झाले. या निर्णयामुळे वेळेची बचत झाली आहे. दोघेही स्वतंत्र्यपणे आयुष्य जगण्यास मोकळे झाले असून, मुलीचे भवितव्यही उज्वल आहे.

- अॅड. राणी कांबळे-सोनावणे, अर्जदारांच्या वकील

# नगरपंचायतीचा सुधारित विकास आराखडा जनतेवर अन्यायकारक; वडगाव शहर भाजपचा आरोप

वडगाव मावळ : वडगाव शहराचा सुधारित विकास आराखडा नगरपंचायत प्रशासनाने प्रसिद्ध केला आहे. मात्र सदर विकास आराखडा हा सामान्य जनतेवर अन्याय कारक असून तो धनदांडण्यासाठी धार्जिना आहे असा आरोप वडगाव शहर भाजपने केला आहे. याबाबत वडगाव नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी तथा प्रशासन डॉ प्रविण निकम यांना निवेदन देण्यात आले आहे




यावेळी तीर्थक्षेत्र श्री पोटोबा महाराज देवस्थानचे मुख्यविश्वस्त किरण भिलारे,माजी सभापती गुलाबराव म्हाळसकर, सचिव अनंता कुडे, शहराध्यक्ष संभाजी म्हाळसकर यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर निवेदनात म्हटले आहे की वडगाव नगरपंचायत प्रशासनाने नुकताच दुसरा विकास आराखडा प्रसिध्द केला आहे.सदर वडगाव शहराचा विकास आराखडा हा सामान्य जनतेवर अन्याय कारक असून तो धनदांडण्यासाठी धार्जिना आहे, असा आरोप भाजपने केला आहे.

वडगाव मावळ येथील पोटोबा महाराज दत्त, महादेव, मारूती देवस्थानास शासनाने 'क' दर्जा प्राप्त झालेला आहे. सदर देवस्थान हे तालुक्याचे श्रध्दास्थान आहे. भविष्याचा विचार करिता धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमासाठी जागेची आवश्यकता भासणार आहे, तरी पोटोबा देवस्थान यांच्या जमिनीवर तीन - तीन ठिकाणी आरक्षण टाकून सदर जागा बाधित केलेली आहे. आजुबाजुचे धनदांडगे बांधकाम व्यावसायिक यांच्या जागा शाबुत ठेवून देवस्थानच्या जागा मात्र आरक्षण टाकून बाधित केलेल्या आहेत.

सदर विकास आराखड्यामध्ये जैन बांधवाचे श्रध्दास्थान असलेले आणि साधुसंतांचे निवासस्थान असलेले तळ्याजवळील जैन स्थानकावर जाणून बुजुन नव्याने आरक्षण दाखविण्यात आलेले आहे. तरी तमाम जैन बांधवांच्या धार्मिक भावनांचा आदर करून जैन स्थानकावरील आरक्षण तत्काळ हटविण्यात यावे ही मागणी देखील करण्यात आली.

वडगाव बाजारपेठेतील जुना पुणे मुंबई महामार्ग बाजारपेठेमध्ये पूर्व बाजूकडून वडगाव गावठाण हद्दीमध्ये पुढे वडगांव कोर्ट गेट नंबर १ पर्यंत १२ मीटर रूंदीचा असावा तसेच प्रभाग क्रमांक ९ मधील गावठाण हद्दीतील श्री चिंचेचा चिंतामणी गणपती मंदिर जवळील अंतर्गत रस्ता देखील ९ मीटर ऐवजी ६ मीटर करावा ही देखील आमची मागणी असल्याचे या निवेदनात नमूद केलेली आहे.

अनेक नागरिकांनी देखील यांचा आरक्षणाच्या बाबतीत असलेल्या तक्रारी या निमित्ताने नमूद केल्या तसेच नको असलेले आरक्षण तातडीने हटवावे यासाठी निवेदन देखील सादर केले. वरिष्ठ अधिकारी यांना कळवून पुन्हा लेखी हरकती मागवुन आवश्यक बदल पुन्हा करू असे आश्वासन वडगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी आणि प्रशासक डॉ.प्रवीण निकम यांनी दिले आहे

# नाझरे धरण तुडुंब..२५० क्युसेकने जलाशयाच्या सांडव्यावरून : ग्रामस्थाकडून जलपूजन

जेजुरी - उत्तर पूर्व पुरंदर आणि उत्तर पश्चिम बारामती तालुक्याची जीवनवाहिनी समजले जाणारे आणि ७८८दशलक्षघनफुट पाणी साठवण क्षमता असलेला क-हा नदीवरील नाझरे (मल्हार सागर )जलाशय १००टक्के भरला असून १९९४ सालानंतर प्रथमच जून महिन्यात जलाशय पूर्ण क्षमतेने भरला आहे. सुमारे २५० क्युसेकने जलाशयाच्या सांडव्यावरून विसर्ग होत असल्याची माहिती नाझरे पाटबंधारे शाखा अभियंता अनिल घोडके, वरिष्ठ कर्मचारी विश्वास पवार यांनी दिली.


नाझरे (ता. पुरंदर) : जलाशय १०० टक्के भरल्याने भंडारा-फुलांची उधळण करून जलपूजन

आषाढ मासाच्या प्रथम दिवसाचे औचित्य साधून गुरुवारी (दि.२६) जेजुरीकर ग्रामस्थ, खांदेकरी, मानकरी, सेवेकरी, पुजारी वर्गाच्या वतीने पापनाश तीर्थ (रंभाई शिंपींन कट्टा)येथे वाजत गाजत जाऊन विधिवत पूजन, क-हामाईला साडी चोळी अर्पण करीत भंडारा-फुलांची उधळण केली तसेच महाआरती घेण्यात आली. यावेळी प्रमुख मानकरी राजेंद्र पेशवे, सचिन पेशवे, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, सचिव छबन कुदळे, संजय खोमणे, हनुमंत खोमणे पाटील, रामदास माळवदकर, रोहिदास माळवदकर पाटील, पुजारी गणेश आगलावे, महेश आगलावे,

विठ्ठल सोनवणे, सतीश घाडगे, काशिनाथ मोरे, सचिन कदम, दीपक राऊत, सुशील राऊत, भारत शेरे, कृष्णा कुदळे, माजी विश्वस्त नितीन राऊत, सुधीर गोडसे, शिवराज झगडे, संदीप जगताप, नगरपालिका मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले, कर्मचारी अधिकारी वर्ग आदींसह ग्रामस्थ, मानकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, देवसंस्थानच्या वतीने विश्वस्त मंगेश घोणे यांनीही सपत्नीक जलपूजन केले. पुजारी प्रसाद खाडे, गोविंद बेलसरे, शेखर सेवेकरी यांनी धार्मिक विधींचे पौरोहित्य केले.

पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करा -ग्रामस्थांची मागणी

कितीतरी वर्षातून आषाढ मास सुरू होण्यापूर्वी नाझरे जलाशय पूर्णपणे भरला आहे ,मात्र ,नगरपालिका प्रशासनाने पाणी पुरवठ्याचे योग्य नियोजन करावे धरण उशाला आणि कोरड घशाला अशी परिस्थिती आणू नये अशी मागणी ग्रामस्थ मंडळाच्या वतीने मुख्याधिकारी इंगुले यांचेकडे करण्यात आली.

# उरळगावात शेतकऱ्याची दीड लाखाची डाळींब लूट! अज्ञात चोरट्यांचा धुमाकूळ

शिरूर : शिरूर तालुक्यातील उरळगाव परिसरात अज्ञात चोरट्यांनी शेतकऱ्याच्या शेतात घुसून तब्बल १.५१ लाख रुपयांचा डाळींब माल चोरल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, तपासाला गती देण्यात आली आहे.



शेतकरी अमोल बाळासाहेब आफळे (वय ३२, रा. आफळे वस्ती, उरळगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या गट क्रमांक ५१० मधील दोन एकर शेतातील २५२ डाळींब झाडांवरील सुमारे १५१२ किलो भगव्या जातीचा लाल रंगाचा डाळींब माल चोरट्यांनी लंपास केला.

ही चोरी २१ जून २०२५ रोजी रात्री ९ ते २२ जून पहाटे ५ च्या दरम्यान घडली. बाजारभावानुसार १०० रुपये प्रति किलो दराने या मालाची किंमत १,५१,२०० रुपये आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे.वाढत्या चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून, त्यांनी पोलीस प्रशासनाकडे रात्रगस्ती वाढवण्याची आणि कठोर कारवाईची मागणी केली आहे. शिरूर पोलीस ठाण्यात २६ जून रोजी सायंकाळी ७:४८ वाजता या घटनेची नोंद झाली.पोलीस हवालदार भोते यांच्यासह पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. शेतकऱ्यांनी शेत परिसरात सुरक्षाव्यवस्था वाढवावी आणि चोरट्यांना लवकरात लवकर पकडावे, अशी मागणी लावली आहे.